# राजहंस ग्रंथवेध

वर्ष : सोळावे
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४
अंक : दहावा-अकरावा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ६८

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ



# केस गळतायेत?






## मजबूत व निरोगी केसांसाठी

# नोविग

रोज सकाळ - संध्याकाळ
१-१ गोळी

**मेडीकल व आयुर्वेदिक स्टोअर्समध्ये उपलब्ध**

आपल्या परिसरात उपलब्धते साठी Whats App वर संपर्क करा

**वितरक : एस्व्ही फार्माकेम प्रा. लि.** 412, नारायण पेठ, मुंजाबा लेन, पुणे- 411030.

eSVee 9423044267 7888011004

FIND US ON

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी ‘राजहंस’ प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
शर्मिली जोशी

वर्ष सोळावे :
अंक दहावा-अकरावा
१५ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४

मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी

१. ओंजळीतील चाफा / ९
२. सो कुल.. टेक २ / १३
३. राग दरबारी / १९
४. टीव्ही, मालिका आणि बरंच काही...! / २५
५. चंदेरी-सोनेरी / २९
६. मी सखा मेघदूत / ३३
७. एक उलट... एक सुलट / ३९
८. गेले लिहायचे राहून / ४५
९. देठ जगण्याचा / ४९
१०. सृजनाचा मळा / ५३

हा दिवाळी अंक ललित निबंध विशेषांक आहे. आमच्या ललित निबंधांच्या पुस्तकांतील वेचे अंकासाठी निवडले आहेत.

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail.com ● Website : www.rajhansprakashan.com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू
ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं.
यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी!
यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

### अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

चाळिशीतील जोडप्याचा वैचारिक विसंवाद.
स्त्री-पुरुष लग्नसंबंधातील सार्थकता-निरर्थकता,
जगण्यातील अपरिहार्यता, लांबलेला आत्महत्येचा प्रवास.
सध्याच्या जगण्यावर भाष्य करीत जाणारे नाटक

### पुनश्च हनिमून

संदेश कुलकर्णी

किंमत : ₹ १७५/- । (ट.ख. ₹ ५०)







पुण्यापासून तीनशे किलोमीटरवरची शाळा.
या प्राथमिक शाळा शिक्षिकेचे हे अनुभवविश्व.
शिकणे आनंददायी होण्यासाठी वापरलेली तंत्रे,
क्लृप्त्या, उपक्रम!
शिक्षिका ते शिक्षणाधिकारी असा हा प्रवास -

### माझे शाळेतले प्रयोग

स्मिता गौड

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

*मराठी भाषा आणि उत्तम अर्थार्जन ही जोड जमली पाहिजे. यासाठी सतत सार्वजनिक प्रयत्न चालू पाहिजेत.*

नमस्कार वाचकहो,

हा अंक वाचकांपर्यंत पोहोचेल, तेव्हा दिवाळी चौफेर फुललेली असेल. या वर्षीचा दीपावलीचा आनंद एका सुवार्तेने द्विगुणित झालेला आहे. ती म्हणजे अकरा वर्षांच्या अथक परिश्रमानंतर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. महाराष्ट्राच्या जनतेत आनंदीआनंद पसरला आहे. अभिजात दर्जामुळे मिळणारी रक्कम फक्त लोकसत्तामध्ये शंभर कोटी इतकी दिलेली होती. इतरत्र त्याचा उल्लेख नाही. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या अभ्यासासाठी कौशल्य-केंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याखेरीज केंद्रीय विद्यापीठांमध्ये मराठी भाषाविषयक अभ्यासक्रम शिकवले जातील, असेही अनेक ठिकाणी म्हटले गेले आहे. हे चित्र आशादायक आहे. यामुळे मराठी भाषेची प्रगती होईल अशी इच्छा करायला हरकत नाही, असे आपल्याला वाटते आहे.

सर्वांनी निर्णयाचे स्वागत केलेले असले, तरी आजवरच्या अनुभवाने आपण सर्व जण साशंक आहोतच. त्यामुळे अभिजात दर्जा मिळूनही नेमके काय साध्य होणार आहे, हा प्रश्न या आनंदाबरोबरच मांडला जातो आहे. मराठी जनताच मराठी भाषेबद्दल उदासीन आहे. हा दर्जा मिळाल्यामुळे मराठी माध्यमाच्या बंद पडलेल्या शाळा पुन्हा चालू होतील का; दूरचित्रवाणी आणि इतर अनेक माध्यमांत जी आंग्लाळलेली मराठी बोलली जात आहे, ती शुद्ध होईल का; असे प्रश्न विचारले जात आहेत. शिवाय प्रत्येक क्षेत्रात राजकारण घुसते आहे. त्यामुळे निवडणुका जवळ आल्या, हे पाहून मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला गेला असेही बोलले जात आहे.

या बाबतीत असे दिसते की; मराठी माणसांनी मराठी सोडली, मुद्दाम मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडल्या, याचे कारण ती आवडत नाही, तिच्याबद्दल जिव्हाळाच नाही, असे नाही. त्यांच्याकडून ती आपोआप त्यागली जात आहे. इंग्लिशमध्ये शिकल्यावरती जेवढा पैसा मिळू शकतो, तेवढा पैसा मराठीत शिकल्याने मिळू शकत नाही ही आपली धारणा आहे. ती अनुभवांवर अधिष्ठित आहे.

इंग्लिश आत्मसात केली, तर जगात कोठेही नोकरी, कामधंदा करता येईल असे वाटते. अनेकदा इंग्लिश जराही चालत नाही, अशा देशांची उदाहरणे कोणकोणत्या लेखांत किंवा कोणाकोणाच्या बोलण्यात येतात. तरीही त्या देशांमध्ये मराठी किंवा इतर कोणत्याही भारतीय भाषांपेक्षा इंग्लिशचाच उपयोग होणार हे निश्चित आहे. आंतरराष्ट्रीय उद्योजकतेसाठी इंग्लिशची गरज पडते. तेव्हा इंग्लिश ही अनिवार्य आहे, हे लक्षात घेतलेच पाहिजे. पण तिचा संसार तेथेच मर्यादित असावा, तिचे आपल्या सर्व जीवनावर आक्रमण होण्याचे कारण नाही, याची जाणीव ठेवून पावले टाकली पाहिजेत. शिवाय मराठी भाषा आणि उत्तम अर्थार्जन ही जोडी जमली पाहिजे, यासाठी सतत सार्वजनिक प्रयत्न चालू पाहिजेत. भारतातल्या विविध राज्यांच्या एकमेकांशी संपर्कासाठी एक निश्चित अशी भाषा विकसित झालेली नसल्यामुळे, येथेही संपर्कासाठी इंग्लिशचाच उपयोग बऱ्याचदा केला जाताना दिसतो. ही स्थिती बदलली पाहिजे.

सर्वच भारतीय भाषांवर इंग्रजीचे आक्रमण होत आहे. यापूर्वी तमिळ, संस्कृत, तेलुगु, कन्नड, मल्याळम आणि उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. दर्जा मिळाल्यावर या भाषांची नेमकी प्रगती काय झाली, या भाषांमध्ये कोणकोणत्या बऱ्यावाईट घडामोडी झाल्या, निधीचे वितरण कसे झाले; हे निरीक्षिले पाहिजे. याचे अहवाल वर्तमानपत्रातून पुढे आले पाहिजेत. ते मराठीला मार्गदर्शक ठरू शकतील. मिळणाऱ्या निधीचे वितरण नेमके कसे होत जाणार आहे, याची प्रसारमाध्यमातून जनतेला माहिती मिळणे आवश्यक आहे. जनतेनेही ती वेळोवळी मागितली पाहिजे.

येथील एकंदर परिस्थिती लक्षात घेता, या देशातून बाहेर पळ काढण्यासाठी इंग्लिशचा आधार वाटतो. म्हणूनही मुलांना इंग्लिश माध्यमांच्या शाळांत घातले जाते. परदेशी स्थायिक झालेल्यांच्या बोलण्यात येते की, तेथील दैनंदिन जीवन स्वच्छतेचे, सुखाचे आहे. काम करण्याच्या अनेक संधी मिळतात. त्याचा आर्थिक मोबदला पुरेसा मिळतो. दुसऱ्याच्या व्यक्तिगत आयुष्यात डोकावून पाहण्यामुळे होणारा त्रास नाही. रितीभाती, वयाची ज्येष्ठता, जाती यांमुळे येथे निर्माण होणारा सांस्कृतिक ताण तेथे नाही. तेव्हा आपल्या देशात राहावेसे वाटेल असे वातावरण, अशी परिस्थिती येथे निर्माण करणे, आपले सर्वांचेच कर्तव्य आहे. हा प्रश्न मराठीतल्या शाळा बंद होण्याशी निगडित आहे. एकदा शालेय शिक्षणाची भाषा बदलली की स्वभाषेकडे आपोआपच दुर्लक्ष होते.

लेखक, लोक-साहित्याच्या आणि लोक-संस्कृतीच्या अभ्यासक, संशोधक डॉक्टर तारा भवाळकर यांची दिल्ली येथील ९८व्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी निवड झाली. योग्य व्यक्ती योग्य पदावर अधिष्ठित झाली की जो आनंद होतो तो आनंद, तारा भवाळकरांचे अभिनंदन करताना राजहंसला होत

आहे. लोकसंस्कृती आणि नाटक या विषयात तारा भवाळकर यांना प्रामुख्याने रस आहे. अध्यापन क्षेत्रात वावरणाऱ्या, छत्तीस पुस्तके लिहिणाऱ्या तारा भवाळकरांची लेखणी मराठी साहित्याच्या निरनिराळ्या प्रकारांत संवेदनशीलपणे फिरते, तेव्हा मराठी आणि महाराष्ट्राविषयीची आत्मीयता त्यातून आपोआप जाणवते. महाराष्ट्र टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत तारा भवाळकर म्हणतात, 'मराठी शिक्षणाबद्दलची अनास्था पाहताना खंत वाटते. मराठी शाळा बंद पडत आहेत. शिक्षकांची भरती वर्षानुवर्षे होत नाही. शिक्षकांना पगार मिळत नाही. अनुदाने वेळेवर पोहोचत नाहीत. ही परिस्थिती मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने स्पृहणीय गोष्ट नाही, असे मला स्पष्टपणे नमूद करावेसे वाटते. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासून विद्यार्थ्यांना त्या भाषेची गोडी लागली, तरच भाषेचा विकास होतो. केवळ एखादा शिक्का मिळाल्याने विकास होत नाही. विकासाच्या वाटा निश्चितपणे मोकळ्या होतात. त्यासाठी आर्थिक तरतूद राज्यकर्त्यांनी केली तर बाकीच्या गोष्टी सुलभ होऊ शकतील.' तारा भवाळकर यांच्यासारख्या अभ्यासक लेखिकेला अध्यक्ष होण्याचा मान मिळण्यासाठी त्यांचे ८५ वय का बरे उजाडावे लागले? मराठी अभ्यासकांबद्दलची अनास्था हेच याचे कारण असू शकेल का?

दिल्लीसारख्या दूर ठिकाणी खर्च करून जाऊन संमेलनाच्या ठिकाणी पुस्तकांचे दालन मांडणे आम्हाला फार कठीण आहे, असे मराठी प्रकाशक सांगत आहेत. अभिजात दर्जा मिळाल्याने ही परिस्थिती सुधारेल का? असो.

अंधार नाहीसा करून प्रकाशाच्या पणत्या उजळणाऱ्या दीपावलीच्या उत्सवाला आपण सामोरे जात आहोत. मराठी भाषेचा अभिजात दर्जा, एका अभ्यासक स्त्रीची संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड यातून मराठीच्या प्रांगणात काहीतरी भरीव घडेल, अशी शुभेच्छा आपण सगळे मनात धरून, आपापल्या परीने कृतिशील पावले टाकू या!

आमच्या सर्व ग्राहकांना, हितचिंतकांना दीपावली सुख-समृद्धीची जावो.

**विनया खडपेकर**
संपादक, राजहंस प्रकाशन

## ‘राजहंसी’ विविधा



युद्धाची पद्धत बदलली. शस्त्रं बदलली.
पण माणसं मारली जातच आहेत!
त्यांच्या रोज शेकड्यांनी बातम्या येतच आहेत.
युद्धानंतर नेमकं काय पसरून राहतं?
याचा कवितांतून घेतलेला वेध -

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी
तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव,
संघर्ष आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास
चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!

### ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मृणालिनी चितळे

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)






‘कितीही अडचणी, वाईट प्रसंग आले,
तरी डरायचं नाही’ असा संदेश देणारी
वेलवर्गीय वनस्पती - ‘दौशाड’!
तिचाच आदर्श घेऊन माणदेशातील माणसं
हिमतीनं जगत असतात. त्यांची कहाणी सांगणारं...

### दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

## ओंजळीतील चाफा

*एखाद्या गावाची लांबी, रुंदी, खोली, उंची, समृद्धी पाहायची असेल, तर त्या गावाचे ग्रंथालय पाहायला हवे. ग्रंथ आपल्या विचारांचे, निर्णयांचे, कल्पकतेचे स्वातंत्र्य अबाधित राखतात.*

## ग्रंथालयी यावे

'वस्त्रे माणसाची शारीरिक नग्नता लपवतात; पण मानसिक व बौद्धिक नग्नता लपवायची असेल, तर आपटे वाचन मंदिरासारखे वाचनालय असावे लागते.' न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी ग्रंथालयाच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सव समारंभात आपले विचार मांडत होते.

आपल्याला कोणत्याच नग्नतेबद्दल काहीही वाटेनासे झाले आहे. मानसिक प्रगल्भपणा आणि बौद्धिक समृद्धी यांची जगण्याला जणू आवश्यकताच नाही असे अधिक चित्र दिसते. अशा वेळी 'सारा अंधारच प्यावा अशी लागावी तहान' असे म्हणणारे अनेक ग्रंथालयांचे दीपस्तंभही जागोजागी दिसतात. हे दीपस्तंभ आपले अंतर कमी करीत नाहीत, पण आपला मार्ग प्रकाशमान करतात. या प्रकाशात आपण उजळून जावे आणि आपल्या उजळण्याने अनेकांना उजळण्याची प्रेरणा मिळावी, असे काम ही ग्रंथालये करतात. म्हणूनच ती समाजाच्या प्रक्षेपणाची केंद्रे आहेत.



*स्वानंद मुकुंद कुलकर्णी*

गांधीवादी विचारवंत आणि संत साहित्याचे अभ्यासक बाळासाहेब भारदे यांनी म्हटल्याप्रमाणे ग्रंथांमुळे ज्ञानाचे भान होते, विचाराचा प्रचार होतो, भावाचा प्रभाव होतो, कल्पनेची साधना होते, स्फूर्तीची मूर्ती होते, सिद्धीची प्रसिद्धी होते. कला सकलांपर्यंत पोहोचते आणि ज्ञानधन हे समाजधन होते. ग्रंथांमुळे बुद्धी पल्लवित

होते, मन प्रभावित होते आणि जीवन संस्कारित होते. ग्रंथसंपत्तीवरून समाजसंस्कृतीचे निदान होते.

त्यामुळे एखाद्या गावाची लांबी, रुंदी, खोली, उंची, समृद्धी पाहायची असेल, तर त्या गावाचे ग्रंथालय पाहायला हवे.

ग्रंथ आपल्या विचारांचे, निर्णयाचे, कल्पकतेचे स्वातंत्र्य अबाधित राखतात.

ग्रंथालयी यावे,<br>
ग्रंथवान व्हावे,<br>
ग्रंथ सांभाळावे तळहाती,<br>
ग्रंथ हाती जसे<br>
दुपट्यात बाळ,<br>
करावा सांभाळ माऊलीचा

डॉ. द. भि. कुलकर्णी यांनीही कवयित्री नीलम माणगावे यांच्या वरील पंक्तीप्रमाणे ग्रंथांचे तान्ह्या मुलांसारखे वर्णन केले आहे. ग्रंथ तान्हाच असतो. एका हाताने त्याला घ्यायचे असते, थोपटायचे असते, डोलवायचे असते, मान धरत नसेल तर हात द्यायचा असतो. त्याला हसवायचे असते, जिवणीच्या टोकाशी गुदगुली करून जांभई दिली, तर आपले बोट त्याच्या तोंडाशी आडवे धरायचे असते.

आईचे मन जसे तान्हुल्यात गुंतलेले असते, तसे वाचकाचे मन ग्रंथात गुंतावे लागते. आईचे तान्हुल्यात गुंतणे ही सृष्टीची, सर्जनाची, आनंदाची सर्वोच्च घटना असते. वाचकाचे मनही ग्रंथात गुंतणे हीदेखील एक सर्वोच्च घटना आहे. त्यामुळे वाचन हा सर्जनाचा उत्सव असतो, सुखाची समाधी असते आणि आत्मसमृद्धीची ती अपार शांती असते. ती केवळ व्यक्तीच्या आत्मसमृद्धीची शांती नसते, तर ती




निवडुंगातून फूल यावे, तसे कवीच्या काटेरी अनुभवाला आलेले करुणेचे फूल या कवितांना साद घालते. कवीची भाषा करुणेचा स्वर लाभलेली सत्याची भाषा आहे.

व्याकुळ पिंपळ

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

समाजाची वाङ्मयीन समृद्धी असते. समाजाची वाङ्मयीन समृद्धी सुदृढ करणे हे त्या समाजाच्या अस्तित्वाचे मूळ उद्दिष्ट असू शकते. हे मूळ ग्रंथालयांच्या माध्यमातून साध्य होऊ शकते. ग्रंथालय सामाजिक बधिरता दूर करून सजगता आणते. बुद्धिमंतांची कृतिहीनता आणि कृतिवानांची बुद्धिहीनता हे सामाजिक ऱ्हासाचे एक प्रमुख कारण असते. ग्रंथालय बुद्धिमंतांना कार्यप्रवण करते आणि कार्यप्रवणता बुद्धीचे कोंदण होते. त्यामुळे सामाजिक स्थिरता प्राप्त होते.

केवळ आदर्शवादाने जगता येत नाही. आदर्शांची पायमल्ली करून जगणे हे जगणे म्हणता येणार नाही. तडजोडीशिवाय व्यवहार नाही. तडजोड आली की, नैतिकता राहील का, सांगता येत नाही. ज्ञानाची साधना करणाऱ्याला प्रतिष्ठा नाही आणि कोणत्याही मार्गाने पण श्रीमंत असणारे प्रतिष्ठित आहेत. भ्रष्टाचारविरहित यंत्रणेपासून दूर राहणे केवळ अशक्य आहे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध ठामपणा ठेवला तर जगणे मुश्कील आहे. असत्याने जाण्याचे धाडस नाही आणि सत्याच्या मार्गाने जाता येत नाही.

संवेदना जपणे ही अशक्य कोटीतील बाब आहे आणि संवेदना सोडल्या तर माणूस म्हणून जगण्याची शक्यता किंचितही नाही. अशा या आजच्या स्थितीत संवेदनशीलता जपण्यासाठी आणि आपले माणूसपण टिकवण्यासाठी ग्रंथालये वाढली पाहिजेत. मग लामणदिव्यातला प्रकाश गाभाऱ्यावर पडावा, तितक्या सहजपणे ग्रंथालयांचा प्रकाश समाजजीवनावर पडेल; कारण ग्रंथालये काय किंवा कोणत्याच विद्या संस्था या अंतिमत: समाजाच्याच मालकीच्या असतात. ते समाजाचे वंशपरंपरागत धन असते. ग्रंथालयांना आपण पोसले, तर ग्रंथालये समाजाला पोसतील.

◆◆◆

हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा




आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते. अशाच शोधयात्रेत राजीव साने केवळ चिकित्सा करून थांबले नाहीत, तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज त्यांनी ओळखली. भविष्यातील आवश्यक अशा विचारमंथनाच्या दिशेने जाणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.

### स्फूर्तिवादी नीतिशास्त्र

राजीव साने

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)

लिहावं की लिहू नये?
या प्रश्नातून मोकळं होऊन
बिनधास्त केलेलं लेखन! वैचारिक, भावनिक
कोलाहल टिपणाऱ्या नोंदी.

### ग्राफिटी वॉल

कविता महाजन

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)







निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार,
मानवी स्वभावातील भावनाट्य,
कवितेचा रुणझुणता चरण
यावरील आत्मचिंतनातून आलेले लेख

### गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# सो कुल.. टेक २

*घरातली वयस्कर माणसं, आमच्या शाळा-डबा-परीक्षा, स्वयंपाक... या सावळ्या गोंधळात नोकरी धरणं अवघड होतं. तिनं पर्याय शोधून काढला - 'सोनाली पाळणाघर'.*

## सोनाली पाळणाघर

माझ्याएवढ्याच लहानशा मीनाक्षी तेरेदेसाईनं अतिशय अनौपचारिकपणे उद्‌घाटन केलं. म्हणजे काय, तर १ ऑगस्ट १९८४पासून रोज ती आमच्याकडे यायला लागली. तेरेदेसाई काकू शिक्षिका होत्या. त्या शाळेत जाताना मीनूला आमच्याकडे सोडायच्या आणि संध्याकाळी घेऊन जायच्या. मीनूच्या पाठोपाठ आशय-अश्विनी हे जुळे, गायत्री, नीलांबरी, गौरव, मधुरा, अभिजय, रीना, शशांक, अमित.. असे कितीतरी जण आमच्या कुटुंबात म्हणजेच माझ्या आईनं सुरू केलेल्या पाळणाघरात प्रवेशते झाले.

कौटुंबिक परिस्थिती नाजूक आर्थिक टप्प्यातून जायला लागली होती. बाबांचा प्रवास वाढला. आम्ही भावंडं मोठी व्हायला लागलो होतो. खर्च वाढतच चालले होते. ओढाताण सुरू झाली तेव्हा आईला स्वस्थ बसवेना. घरातली वयस्कर माणसं, आमच्या शाळा-डबा-परीक्षा, येणी-जाणी, स्वयंपाक.. या सावळ्या गोंधळात नोकरी धरणं अवघड होतं. तिनं पर्याय शोधून काढला. तिला मुलांची आवड होती. त्यातून सुरू झालं- 'सोनाली पाळणाघर'.



*सोनाली कुलकर्णी*

खरं म्हणजे मी आईचं पाळणाघर म्हणायला पाहिजे. पण पहिल्यापासून मला आईचा हा 'व्यवसाय' आहे असं कधी वाटलंच नाही. पाळणाघरातली सगळी मुलं

आमची भावंडं झाली. त्यांचे वाढदिवस आमच्या घरी साजरे झाले. त्यांना शुभंकरोति आईनं शिकवली. चिऊकाऊचा घास भरवला. आजारपणं काढली. समजूत घातली. मला फार सुंदर वाटतात ते दिवस. अर्थार्जनाचा किती सन्मान्य मार्ग शोधला आईनं. तिनं आकारलेली नाममात्र फी आठवून हसू येतं तिच्या भाबडेपणासाठी. त्या फीच्या कित्येक पट अमूल्य अशी माया केली तिनं मुलांवर. अगदी चार-पाच महिन्यांच्या तान्ह्या बाळापासून ते तेरा-चौदा वर्षांपर्यंत, गरीब, नातेवाईक, तऱ्हेवाईक, अपंग, मतिमंद सगळ्या प्रकारचे मेंबर होते आमच्या पाळणाघरात.

यादरम्यान, आईच्या जीवनशैलीवर बऱ्याच मर्यादा आल्या. ती लग्नसमारंभांना जाऊ शकलीच नाही. कॉलनीच्या भिशी मंडळातून अंग काढून घ्यावं लागलं. परगावी-माहेरी जाता आलं नाही. ट्रिपा, सुट्या, चैन, खरेदी वगैरे तर लांबची गोष्ट. पण तिनं ते कधी जाणवू दिलं नाही. घरातल्या घरात कधी भेदभाव केला नाही. नवरात्र म्हणून घरी पुरणा-वरणाचा स्वयंपाक असेल, तर घरच्यांबरोबर पाळणाघरातल्या प्रत्येकासाठीपण कडबू केले. डबा आणला नसलेल्या मुलांनी आमच्या घरची पोळी-भाजी, आमटी-भात खाल्ला. दुपारचा खाऊ, चिवडा, चुरमुरे, शेंगदाणे याची आमच्याकडे रेल चेल असायची. आईबरोबर बागेत काम करणं, स्वयंपाक शिकणं, दप्तर नीट भरणं, जेवताना पानात काही न टाकणं अशा कितीतरी संस्काराच्या आणि शिस्तीच्या गोष्टी हातात हात घालून या मुलांच्या आयुष्यात आल्या.

कितीतरी जण अजूनही माझ्या आईला आईच म्हणतात. मला सोनालीताई म्हणतात. संदीप-संदेशला राखी बांधायला येतात. स्वत:च्या साखरपुडा-लग्नाला आवर्जून आई-बाबांना आमंत्रण द्यायला येतात. दर १ ऑगस्टला बाबा टिळकांचा फोटो खाली काढतात आणि आई त्या फोटोसाठी आमच्या बागेतल्या फुलांचा हार करते. आम्ही पुण्यात असलो तर टिळकांना नमस्कार करतो किंवा आई-बाबांना


**नव्या आवृत्तीचे आगमन**




संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला
पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस
असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

आठवणीनं फोन करतो. किती सुंदर नाती जोडली गेली आईच्या या उपक्रमामुळे. आमच्या मोलकरणीपासून नातेवाइकांपर्यंत सगळ्यांना आईच्या पाळणाघराचा आधार वाटायचा. कुणाची घरगुती भांडणं आईनं मिटवली, तर कुणाकडून – अडचण होती म्हणून – फीच घेतली नाही. कुणाचं व्यसन सोडवलं, कुणाला स्वाभिमानानं राहायला शिकवलं.. मोठ्यांना नमस्कार करणं असो की कुणाला मदत करणं.. आमच्यावर झाले तेच संस्कार या मुलांवरही झाले. तिच्यापासून प्रेरणा घेऊन हा घरगुती उद्योग ओळखीच्या कितीतरी जणींनी सुरू केला.

किती भरून येतंय आज हे लिहितानासुद्धा! या वर्षी टिळकांच्या फोटोला अजून एका चिमुकल्या हातांचा नमस्कार. माझ्या बाळालासुद्धा तुझ्यासारखी माया करणारं, काळजी घेणारं पाळणाघर मिळू दे.. तिलाही मोकळं वातावरण, छान मित्रमैत्रिणी मिळू देत तिथे.. मग मीही निर्धास्तपणे माझं बाळ सोपवून कामाला निघेन.. थँक यू आई.. तुला आणि तुझ्यासारखी प्रेमळ पाळणाघरं निर्माण करणाऱ्या सगळ्या संचालिकांना..

◆◆◆


गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...



पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर



दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)

**अभिनंदन!**

## 'धृपद एंटरटेनमेंट' आणि 'महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना' यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या 'साहित्यवलय लक्षवेधी पुरस्कार २०२४'चे मानकरी



मिरॅकल

◆

डॉ. सुनील विभुते




---



बंदिवान

◆

अनु. : वसुधा जोशी



---



वसुंधरेचे
शोधयात्री

◆

डॉ. अनुराग लव्हेकर



अभिनंदन!

‘धृपद एंटरटेनमेंट’ आणि ‘महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना’ यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या ‘साहित्यवलय सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार २०२४’चे मानकरी



शब्द सूर
जपून ठेव...

नेहा लिमये




---



दौशाड

डॉ. नंदकुमार राऊत




---



डोईचा पदर
आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन



# *वावटळ पेराल, तर वादळच उगवेल!*

पाश्चात्त्य भूराजकारणाने पूर्वेत माजवलेला युद्धकहार
जर्मन भाषेतून थेट मराठीत...

मिशाएल ल्यूडर्स । अनु : वैशाली करमरकर

इराण, अफगाणिस्तान, इराक, सिरिया, लिबिया, पॅलेस्टाईन, लेबॅनॉन, येमेन - या देशांची वाताहत होण्यास युरोप-अमेरिकेची स्वार्थी कूटनीती कारणीभूत आहे.
जगभर युद्धे छेडण्यामागे गोऱ्या जगाचे कोणते अर्थकारण असते?
देशोदेशी अंतर्गत विद्रोह कसा पेरला जातो?
त्यासाठी CIA किंवा MI6 यांच्या वंशावळीतील किती गुप्तचर यंत्रणा
'सांस्कृतिक' आवरणाखाली देशविदेशी सरकारे उलथविण्याची कामे
शस्त्रास्त्रे लॉबीच्या संगनमतातून कशी पद्धतशीरपणे करतात?
या सर्व प्रश्नांचा गेल्या साठसत्तर वर्षांचा आढावा
हे पुस्तक एखाद्या गुन्हेगारी रहस्यकथेसारखा घेते.




या पुस्तकातील घडामोडी म्हणजे आपल्या सर्वांसमक्ष घडत असलेला एक भीतिदायक थरारपट आहे.

किंमत : ₹ २६०/-
(ट.ख. ₹ ५०)

## राग दरबारी

*एका अत्यंत सुंदर नाच करणाऱ्या, गोड चेहऱ्याच्या पण साध्यासुध्या मध्यमवर्गीय मराठी मुलीला ओळखत होते, ती हीच का?*

# माधुरी मनमोहिनी आणि स्नेहलता देशमुख

'एक दो तीन'च्या तालावर बेधुंदपणे थिरकत, एकेका कटाक्षानं समोरच्याला घायाळ करत, एकेका पदन्यासानं बेभान जमावाला नाचवत 'तेजाब' मधली रूपसुंदरी मोहिनी पडद्यावर अवतरली आणि तिने १९८८मध्ये कोट्यवधी प्रेक्षकांवर गारूड केलं. नंतर तीन दशकं उलटली, तरीही ते गारूड रसिकांच्या मनावरून उतरलं नाही.

प्रेक्षकांमध्ये बसून ही जादू रुपेरी पडद्यावर प्रत्यक्ष अनुभवली, तेव्हा मी पार चक्रावून गेले होते. आत्ता आत्ता कालपरवापर्यंत माधुरी दीक्षित नावाच्या ज्या एका अत्यंत सुंदर नाच करणाऱ्या, गोड चेहऱ्याच्या पण साध्यासुध्या मध्यमवर्गीय मराठी मुलीला मी ओळखत होते, ती हीच का?

पुस्तकाचं एक पान उलटावं आणि नवीन पानावर नवीन गोष्ट सुरू व्हावी, तशीच 'मनमोहिनी' माधुरीची खरी गोष्ट 'तेजाब'पासून नव्या रंगांमध्ये नव्या तेजानं उजळून निघाली.


शोभा बोंद्रे

अंधेरीच्या मरोळ भागामधलं 'डिव्हाईन चाइल्ड' नावाचं कॉन्व्हेंट स्कूल. इथे माझी मुलगी शलाका आणि माधुरी केजीच्या बालवर्गापासून एका वर्गात होत्या. त्या दोघी अत्यंत घट्ट मैत्रिणी होत्या, असं नाही; पण त्या शाळेत आधी मोजक्याच मराठी मुली. त्यात ह्या दोघींचाही नाचात, नाटकात पुढाकार असायचा. दोघींच्या आया आपापल्या मुलीला नटवायला-थटवायला प्रत्येक कार्यक्रमाआधी जातीनं उपस्थित असायच्या. त्यामुळे मुलींच्या

आयांची आणि मुलींची चांगली मैत्री झाली. सूर जमायला आणि गप्पा रंगायला आणखी एक समान धागा होता, तो म्हणजे आमच्या दोन्ही घरांमधलं मराठी आणि कलासक्त वातावरण.

आमच्या घरात नाटक, नाच, साहित्यासंबंधी सगळ्यांचा सक्रिय सहभाग. तर माधुरीच्या घरातही कथक नृत्य आणि संगीत शिकणारी, सादर करणारी कलाप्रेमी मंडळी. किंबहुना शाळेतली माधुरी जी माझ्या मनात ठसली आहे, ती कथकच्या पारंपरिक वेशात सजलेली, रंगमंचावरची नृत्यांगना म्हणूनच. तिच्या लालित्यपूर्ण हालचाली, भावविभोर अभिनय, जोशपूर्ण तालबद्ध पदन्यास आणि कथक नृत्याची खासियत असलेल्या वेगवान परिपूर्ण चकरा. सर्वच अद्भुत.

आता मागं वळून पाहताना आणि आठवताना गंमत वाटते, कारण रंगमंचावरची ही विजेसारखी चमचमणारी माधुरी त्या काही क्षणांपुरतीच. एरवी नेहमीच्या वेशभूषेत ती एक छान चेहऱ्याची पण साधीसुधी, सर्वसाधारण विद्यार्थिनी. शंभर मुलींच्यात लपून जाणारी.

डिव्हाईन चाइल्ड शाळेतल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये एक उत्साही पालक म्हणून माझा खूप सहभाग असायचा. जसा की, मी तिथं बसवलेला एक नाच. बागेतली वाऱ्यावर डोलणारी नाचणारी काही फुलं आणि त्यांच्या आनंदामध्ये बाधा आणणारे दोन भुंगे – अशी गोष्ट मी रचली. पार्श्वसंगीतासाठी पाश्चिमात्य वाद्यमेळ असलेले काही तुकडे एकत्र केले. भुंगे खलनायक असले, तरी खरं नृत्यकौशल्य त्यांनाच दाखवायचं होतं. त्यासाठी भुंग्यांच्या काळ्या वेशात शलाका आणि माधुरीची जोडी सिद्ध झाली. शाळेच्या वार्षिकोत्सवात ह्या नाचाचं कौतुक झालंच, पण नंतर पार्ल्यामध्ये भरलेल्या एका आंतरशालेय महोत्सवातही ह्या नाचानं प्रथम पारितोषिक पटकावलं. ह्याच महोत्सवामध्ये शास्त्रोक्त नृत्याच्या स्पर्धेत माधुरीचा पहिला नंबर आला आणि शलाकाचा दुसरा. कुठच्याही नृत्यस्पर्धेत कायम पहिला नंबर मिळवणं, हे काही माधुरीला नवीन नव्हतं. किंबहुना तो तिचा हक्कच आहे, अशा आत्मविश्वासानं ती रंगमंचावर पाऊल टाकायची. कथक नृत्यामधल्या प्रावीण्यामुळे तिला शाळेत असताना राष्ट्रीय शिष्यवृत्तीही मिळाली होती.

विशेष गोष्ट सांगायची म्हणजे, दहावीत असताना शाळेतल्या एका इंग्रजी गाण्यांच्या स्पर्धेत तिने भाग घेतला आणि ‘ॲबा’ ह्या त्या काळच्या लोकप्रिय बँडचं एक प्रसिद्ध इंग्लिश गाणं अत्यंत सफाईदार शब्दोच्चारात उत्कृष्टरीत्या पेश केलं. त्याआधी इंग्रजी गाण्यांच्या स्पर्धेत नेहमी शाळेतल्या ख्रिश्चन मुलीच भाव खाऊन बक्षिसं घेऊन जायच्या. साध्यासुध्या पेहरावातल्या आपल्या मराठी माधुरीनं तो पायंडा मोडला आणि शाळेत अनेकांच्या भुवया उंचावल्या.

नाच, गाणं आणि शाळेच्या नाटकात भाग घेणारी माधुरी मला माहीत होती. पण

पुढे स्वरूपसुंदरी म्हणून जिने लाखो करोडो प्रेक्षकांना जिंकून घेतलं, त्या माधुरीनं जेव्हा शाळेतल्या सौंदर्यस्पर्धेत भाग घेतला, तेव्हा काय झालं?

तर ह्या मुलींच्या शाळेमध्ये आयोजित केलेली 'मिस डिव्हाईन चाइल्ड' ही सौंदर्यस्पर्धा.

डिव्हाईन चाइल्ड शाळेत पंजाबी, पारशी, ख्रिश्चन, दक्षिण भारतीय अशा नानापरींच्या वेगवेगळ्या जातिधर्मांच्या मुली. बहुसंख्य उच्च मध्यमवर्गीय, तर बऱ्याचशा श्रीमंतसुद्धा. सौंदर्यस्पर्धेत भाग घेतलेल्या अनेक मुली अगदी फिल्म स्टारसारख्या नटून आल्या होत्या. अत्याधुनिक स्टाईलचे कपडे, त्याला शोभेशी केशभूषा, मेकअप, उंच टाचांच्या सँडल्स् वगैरे वगैरे. शाळेच्या प्रिन्सिपल सिस्टर जेनेव्ही आणि इतर शिक्षिकांनी सौंदर्यस्पर्धेसाठी इंग्रजी 'T' ह्या अक्षराच्या आकाराचं खास स्टेज तयार करून घेतलं होतं.

आपापले कपडे आणि रूप मिरवत, अगदी व्यावसायिक मॉडेल्सच्या टेचात पोरी स्टेजवर चालत येत होत्या. टाळ्यांचा अखंड गजर चालू होता. ह्या सर्व झगमगाटात तुलनेनं साधीसुधी अशी माधुरी स्टेजवर केव्हा आली आणि गेली, कळलंही नाही. शेवटी परत एकदा टाळ्यांचा कडकडाट आणि मग निकाल जाहीर झाला.

सौंदर्यस्पर्धेच्या ह्या सर्व उत्साही माहोलमध्ये पहिला-दुसरा नंबर तर जाऊ द्या,


घरातल्या, गावातल्या, देशोदेशीच्या,
व्यायामशाळेतल्या, खेळांतल्या गमतीजमती
दिलीप प्रभावळकर यांच्या
खुसखुशीत शैलीत...




गुगली

आवृत्ती दहावी । किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. ₹ ५०)




नवी गुगली

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

माधुरीला कोणतंच बक्षीस मिळालं नाही. स्पर्धा संपली. विजेत्या मुलींचं अभिनंदन करण्यासाठी आम्ही पालक रंगमंचामागं गेलो. मला माधुरी दिसली. चेहरा पडलेला, थोडीशी खिन्न आणि उदास.

मी म्हणाले, ''माधुरी, नंबर वगैरे जाऊ दे, पण तू खूप छान दिसत होतीस. विशेषत: चालत स्टेजच्या पुढे येऊन तू जेव्हा प्रेक्षकांकडे पाहून एक स्माईल दिलंस, तेव्हा अगदी सुंदर दिसलीस.''

माझ्या बोलण्यावर आणखीच चेहरा पाडून ती म्हणाली, ''काय, मावशी, उगीचच? मला माहीत आहे, माझ्या चेहऱ्यावर लाफ-लाइन्स आहेत. त्यामुळे आमच्या घरात माझी मोठी भावंडं मला नेहमी चिडवतात. ती म्हणतात, 'माधुरी हसली की, आजीबाईसारखी दिसते.''

''अगं—''

मी मनापासून आणि खरं बोलले, हे मग मी तिला सांगितलं नाही. त्या क्षणी ते तिला पटलंही नसतं.

मध्यंतरात बरंच काही घडून गेलं. माधुरी फिल्म स्टार झाली. लाखो करोडो प्रेक्षकांना माधुरीनं जिंकून घेतलं. तिचं सौंदर्य, तिची अदाकारी, तिच्या व्यक्तिमत्त्वामधलं माधुर्य सगळंच अलौकिक, पण तिचं हसू? ते तर लाखात एक.

माधुरी पार्ले कॉलेजमध्ये अकरावीला होती, तेव्हाची गोष्ट. मी त्या वेळी पार्ल्याच्या लोकमान्य सेवा संघात सांस्कृतिक कार्यवाह होते. 'एक कलाकार एक संध्याकाळ', असा एक नवा उपक्रम आम्ही आखला. शास्त्रीय नृत्य आणि शास्त्रीय गायन ह्या क्षेत्रातल्या नवीन गुणवान कलावंतांना वाव द्यायचा आणि महिन्यातून एकदा त्यांचा कार्यक्रम करायचा, अशी ही योजना. ह्यातला पहिलाच कार्यक्रम मी ठरवला, 'माधुरीचं कथक नृत्य'.

लोकमान्य सेवा संघासारख्या मोठ्या प्रसिद्ध संस्थेमध्ये, पार्ल्यातल्या रसिक दर्दी




हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच असा आहे की,
स्वत:शीच हळुवारपणे गुणगुणल्यासारखीच ती व्यक्त होते.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता
त्यांच्या कवितेत अगदी स्वाभाविकपणे आली आहे.
**- मंगेश पाडगावकर**

दंवभिजली वही

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)

प्रेक्षकवर्गासमोर आपली कला सादर करायची, ही नवोदित कलाकारासाठी मोठी संधी होती. माधुरीच्या आई खूप खूश झाल्या. त्यांनी मला एकच विनंती केली, ''माधुरीच्या बरोबर तिची बहीण रूपाही नृत्य करेल, चालेल का?'' मी होकार दिला.

संस्थेच्या ठरलेल्या पद्धतीनं ह्या उपक्रमाची, त्यातल्या पहिल्या कार्यक्रमाची आणि कलाकारांची पार्ल्यात प्रसिद्धी करण्यात आली. ''उपक्रम चांगला आहे, नवीन कलाकारांना उत्तेजन द्यायला आणि त्यांची कला पाहायला आम्ही नक्की येऊ.'' असं अनेक लोकांनी मला सांगितलं.

कार्यक्रमाच्या दिवशी मी ठरलेल्या वेळेच्या तासभर आधी संस्थेत पोचले. स्टेज, माईक, प्रकाशयोजना, प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था अशी सर्व तपासणी करून मी बाहेर येऊन प्रेक्षकांची वाट पाहायला लागले. रंगमंचामागे माधुरी आणि रूपा दोन्ही कलाकार मुली तयार झाल्या होत्या, पण सांस्कृतिक शाखेचे इतर सभासद आणि माधुरीचे दोन-चार कुटुंबीय सोडले तर बाकी प्रेक्षकांचा पत्ता नव्हता.

'देवा, शंभर प्रेक्षक तरी येऊ देत, म्हणजे आपली लाज राखली जाईल आणि कलाकारांचीही.'

मी मनातल्या मनात धावा केला. एक-दोन, एक-दोन असे तुरळक प्रेक्षक येत होते. नकळत मी संख्या मोजत होते, 'तीस–एकतीस, सत्तावन्न–अठ्ठावन्न' वगैरे वगैरे.

कार्यक्रमाची वेळ उलटून पंधरा-वीस मिनिटं झाली, तरीही 'शंभर' हा जादूचा आकडा मी मोजू शकले नाही. शेवटी नाइलाज झाला आणि कार्यक्रम सुरू करायला मी आत पळाले.

ती संध्याकाळ, त्या वेळी आलेलं टेन्शन आणि 'प्रेक्षक येऊ देत' म्हणून केलेला देवाचा धावा ह्या सगळ्या गोष्टी आता आठवल्या की, हसायला येतं; कारण ह्या घटनेनंतर चारपाच वर्षांतच माधुरी सुपरस्टार झाली. तिच्या दिसण्याचं, प्रसन्न हसण्याचं जसं भरभरून कौतुक झालं, तसंच तिच्या नृत्यकौशल्यानंही प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

◆◆◆

विविध क्षेत्रांत लखलखीत कामगिरी केलेल्या
अनेक वलयांकितांची शब्दचित्रे म्हणजे
वाचकांसाठी एक संपन्न मैफीलच!

**राग दरबारी** काही वलयांकित गाठी भेटी

शोभा बोंद्रे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)



## मंगला गोडबोले यांची ‘राजहंसी’ पुस्तके



पाककला, ब्यूटी पार्लर, फेरीवाले,
राशीभविष्य अशा अनेक दैनंदिन विषयांवरील
खुसखुशीत लेखन...

### झुळूक

मंगला गोडबोले

आवृत्ती नववी । किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. ₹ ५०)

आधुनिक बाईच्या आयुष्याच्या
प्रत्येक वळणावरचे मनोव्यापार
रेखाटणारं लेखन...

### काय तुझ्या मनात?

आधुनिक स्त्रीच्या भावजीवनाचा शास्त्रशुद्ध मागोवा

मंगला गोडबोले

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ १२५/- । (ट.ख. ₹ ५०)







आईविषयी खूप काही सांगता येतं,
तरी काहीतरी बाकी उरतंच!
सर्वात जास्त गौरवलं जाणारं नातं आईचं!
त्या आईवरील...

### आई, तुझ्याच ठायी...

मंगला गोडबोले

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

*ह्या सगळ्यात प्रत्येकाचे घरगुती प्रॉब्लेम्स, सणवार असतात. नाटकाचे दौरे, आजारपणं असतात. तरीही पन्नास-साठ-सत्तर माणसं फेर धरून नाचल्यासारखी शूटिंग करत असतात - 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असतोच.*

## टीव्ही मालिकांचा अखंड झपताल...

प्रत्यक्ष शूटिंगच्या दिवशी सकाळी सगळ्यात आधी जे लोकेशन ठरलेलं असेल, तिथे टेम्पो जातो. ज्यात लाइट्स, स्टँड्स, बेसिक प्रॉपर्टी, ट्रॉली, खुर्च्या वगैरे असतात. त्याच्या पाठोपाठ स्पॉट बॉइज आणि प्रॉडक्शन मॅनेजर, कंट्रोलर, शेड्यूलर, मेकअपमन, हेअरड्रेसर, कॉस्च्यूम असिस्टंट, लाइट बॉइज ही मंडळी पोहोचतात. ती त्यांची तयारी सुरू करतात. टेम्पोतून सामान उतरवलं जातं. एकीकडे चहा-कॉफी, नाश्ता ह्यांची तयारी सुरू होते.

साधारण जे पहिल्या सीनमध्ये असतात, त्या कलाकारांना ८.१५ किंवा ८.३०चा कॉल टाइम असतो. ते येऊन तयार व्हायला तासभर लागेल असं गृहीत धरलेलं असतं. एव्हाना लेखकाने पहिल्या सीनची डायलॉग कॉपी 'क्रिएटिव्ह डायरेक्टर'कडे पाठवलेली असते. साहाय्यक दिग्दर्शकानं त्याच्या कॉपीज काढलेल्या असतात. तो त्या नटांना नेऊन देतो. नटमंडळी तयार व्हायला लागतात. मेकअप-हेअर-कॉस्च्यूम्स सगळं करून सीन वाचतात, पाठांतर करतात. एकीकडे दिग्दर्शक, कॅमेरामन आलेले असतात. ते सीन कसा शूट करायचा ह्याची चर्चा करतात. लायटिंग सुरू होतं. त्या सीनमध्ये लागणारी प्रॉपर्टी आहे का ते चेक केलं जातं. रेकॉर्डिस्ट नटांना माइक देतात. नट



*मुग्धा गोडबोले*

माइक लावतात. सेटवर जातात. सीन्सची तालीम होते. शूटिंग होतं.

म्हटलं तर इतकं सोपं आहे. पण...

टेम्पो उशिरा आला... प्रॉपर्टीची लिस्ट नीट केली नव्हती... पहिल्या सीनच्या ॲक्टर्सना यायला उशीर झाला... 'मुंबईकर' पाऊस धोधो पडला... ट्रॅफिक... सीन वेळेत लिहून आला नाही... इथपासून गाडी रुळांवरून घसरण्याच्या बऱ्याच शक्यता असतात. मग तांत्रिक अडचणी आल्या, सीन्स मोठे होते, पाठांतराला वेळ लागला, कॉस्च्यूम्सची पेटी वेळेत पोहोचली नाही, लिहून आलेल्या सीनमध्ये दिग्दर्शकाला काही गोष्टी खटकल्या, मग त्या परत लिहून घेतल्या, एखाद्या कलाकाराची तब्येत बिघडली, मध्येच दुसऱ्या कुठल्या तरी सीरियलच्या प्रमोशनचा सीन शूट करावा अशी सूचना चॅनेलकडून आली, त्यात वेळ गेला, अशा असंख्य गोष्टी घडू शकतात. दुसऱ्या सीनच्या नटांना काही एका अंदाजानं बोलावलं आणि पहिल्याच सीनला प्रचंड वेळ लागला, असं तर होऊच शकतं. साधारण दुपारी दोन वाजता 'लंच ब्रेक' होतो आणि संध्याकाळी सात वाजता 'नाश्ता ब्रेक' होतो. जेवण उशिरा आलं, असंही होऊ शकतं. अगदीच क्वचित, पण चॅनेलकडून आयत्या वेळी काहीतरी बदल सुचवण्यात आले, जे करणं भाग होतं म्हणून सीन्स थांबवावे लागले, असंही होतं. एक माणूस पटकन तयार होऊन येणं आणि आठ नट्यांनी एका वेळी तयार होऊन येणं ह्यांत वेळेत किती फरक पडत असेल? मग सेटवर भयंकर प्रखर प्रकाशामुळे उकडतं. जरी एसी असले, तरीही त्यांचा आवाज येत असेल, तर सीनच्या वेळी ते बंद ठेवावे लागतात. मग घाम येतो. मग मेकअप उतरतो. मग तो पुन्हापुन्हा 'टच अप' करावा लागतो. सेटचं छप्पर कॉंक्रीटचं नसेल, तर त्यावर पावसाच्या थेंबांचा आवाज येतो, त्यामुळे थांबावं लागतं. कधी-कधी माइक्सचा




आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा
भाग झालेल्या टीव्ही मालिका.
त्याबद्दल स्वत:ला आणि प्रेक्षकांना पडणाऱ्या
अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं,
'मालिका' या विषयावर मार्गदर्शन करणारं पुस्तक...

**टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!**

मुग्धा गोडबोले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

प्रॉब्लेम होतो. हे सगळं जितक्या चांगल्या प्रतीचं असेल, यंत्रसामुग्री जितकी नवी नि चांगली असेल, तितक्या त्या गोष्टी बिघडण्याच्या शक्यता कमी. पण पुन्हा एकदा... जेवढं सगळ्याचं बजेट, तेवढ्या क्वालिटीची सामग्री. गेल्या काही वर्षांत ज्या प्रमाणात महागाई वाढलीय, त्या प्रमाणात मालिकांची बजेट्स वाढलेली नाहीत हे आपण पाहिलंच. आता रिझल्ट अतिशय चकचकीत आणि हिंदी मालिकांसारखा 'पॉश' अपेक्षित असतो; पण बजेट त्याच्या एक चतुर्थांशसुद्धा नसतं. तरीपण 'मुंबई स्पिरिट'इतकंच 'शूटिंग स्पिरिट'सुद्धा कमाल असतं. सर्व अडचणी पार करत शूटिंग होतं, दिवसाला अपेक्षित तेवढं फूटेज 'काढलं' जातं. ते एडिटरकडे पाठवलं जातं. एडिटर ते तुकडे जोडून त्याच्यावर 'बीजीएम' म्हणजे बॅकग्राऊंड म्युझिक करायला देतो. एपिसोडचा रफ कट चॅनेलकडे आणि प्रोड्यूसरकडे पाठवला जातो. तो चेक केला जातो आणि मग त्याची फायनल मिक्स्ड कॉपी सबमिट होऊन ठरावीक वेळी आपल्याला तो एपिसोड घरबसल्या दिसतो.

ह्या सगळ्यात प्रत्येकाचे घरगुती प्रॉब्लेम्स असतात. सणवार असतात. इतर कामं असतात. नाटकांचे दौरे असतात. आजारपणं असतात. तरीही ही पन्नास-साठ-सत्तर माणसं फेर धरून नाचल्यासारखी शूटिंग करत असतात. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असतोच. त्यात कलाकारांना टिश्यू पेपर मिळाले नाहीत, केसांच्या पिना मिळाल्या नाहीत; हे प्रश्न फार छोट्या स्वरूपाचे वाटतात. ते चुकीचे अजिबात नसतात, पण संपूर्ण चित्र बघता त्यांचं महत्त्व कमी असतं. निर्मात्याला काळजी असते एपिसोड पूर्ण होण्याची. त्यामुळे अनेकदा 'ईगो प्रॉब्लेम्स' होतात. वाद होतात. कुठलीही व्यक्ती स्वत:ला यंत्रणेपेक्षा किंवा संस्थेपेक्षा मोठी समजायला

त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून
चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले...
सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले...
असा हा मुलखावेगळा कार्व्हर
या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)



लागली, की काहीतरी बिनसायला लागतं. अगदी निर्मात्यालासुद्धा दहा जणांशी जुळवून घेतच काम करावं लागतं. तरच पुढची सगळी साखळी सुरळीत होते.

आणि असा हा विंदा करंदीकरांच्या कवितेतल्यासारखा 'झपताल' अखंड सुरू असतो. दिवसामागून दिवस हा अक्षय मालिकायज्ञ सुरू असतो. त्यात प्रत्येक जण आपापल्या परीनं तूप घाल, कापूर घाल, मंत्र म्हण, समिधा वहा, प्रसाद वाट असं करत असतो. आगगाडीची सगळी चाकं चोख चालावी लागतात, दिव्यांच्या माळेतले सगळे दिवे छान पेटावे लागतात. क्रिकेटच्या संघातला प्रत्येक खेळाडू चांगला खेळावा लागतो, तरच मॅच जिंकण्याची शक्यता असते. एखाद्यानं एकहाती मॅच खेचून आणली असं होतं क्वचित कधीतरी, पण संघ उत्तम असणं फार महत्त्वाचं असतं.

मालिकेला तळटीप देतात, तशीच मीही देतेय. हे माझे वैयक्तिक अनुभव आहेत. माझ्या आजूबाजूला घडलेल्या घटना आहेत. मी पडद्यावर अन् पडद्याच्या मागे असताना जे काही शिकले, पाहिलं, अनुभवलं; ते आहे. त्या सगळ्यातून माझा ह्या मालिकांकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि विचार विकसित होत गेला आहे. अजूनही मी रोज काहीतरी नवीन शिकते, रोज नवनवीन आव्हानं समोर उभी ठाकतात. दर गुरुवारी टीआरपीचा आकडा माझे अनेक अंदाज चुकवतो. मी जितक्या वेगवेगळ्या माणसांबरोबर काम करते, तितक्यांकडून मला नवीन काहीतरी एक गोष्ट कळते. कारण हे सतत बदलत राहणारं, डायनॅमिक क्षेत्र आहे.

कदाचित अजून पंचवीस वर्षांनी मी टीव्हीवरच्या मालिकांबद्दल याहून सर्वस्वी वेगळं असं पुस्तक लिहीन, कारण तोपर्यंत माझी समजूत आणखी विकसित झालेली असेल. आणि मनोरंजनाचं क्षेत्रही! सध्या तरी पुढच्या मालिकेच्या विषयाचा, कथेचा, पटकथेचा आणि संवादांचा विचार करते. कारण खंड पडून चालणार नाही... नाहीतर उद्याचा भाग कसा दिसणार!!

असेच दिवसांमागून दिवस जात राहोत; धावपळीनं भरलेली आणि प्रतिभेनं, कलेनं, ह्या माध्यमाच्या प्रेमानं भारलेली शूटिंग्स होत राहोत; आणि त्यातून तुमचं आणि आमचंही मनोरंजन होत राहो ह्या शुभेच्छांसह निरोप घेते.

पुन्हा भेटू या उद्या संध्याकाळी ७ वाजता.. अमुक एका चॅनेलवर.. तमुक एका मालिकेच्या निमित्तानं...

◆◆◆

## चंदेरी-सोनेरी

*ओपीला काव्यरचनेतील शब्दांची उत्तम जाण होती. त्यामुळेच शब्दांमध्ये तो संगीतानं प्राण फुंकू शकला.*

## आपके हसीन रुख पे

ओंकार प्रसाद नय्यर उर्फ ओपी! याचं आणि माझं काहीतरी नातं असलं पाहिजे. कसलं? कुठलं? कोणतं? गेली अनेक वर्षं मी या प्रश्नाचं उत्तर शोधतोय. त्याचं गाणं मग ते कोणतेही असो, ऐकताना माझे रोम रोम पुलकित होतात. कधीतरी वाटतं त्याचं पंजाबी ठेक्यातील गाणं मला ताल धरायला लावतं, म्हणजे पंजाबच्या मातीशी माझी पूर्वजन्माची नाळ जोडली असेल का? मला आठवतं की, मला कळायला लागलं तेव्हापासून माझ्यावर गारूड केलेलं संगीत हे ओपीचं, म्हणजे तेव्हा गायक, गायिका अथवा संगीतकार यांची नावंदेखील माहीत नसतानाच्या जेमतेम सहा-सात वर्षाच्या वयात खरंच कोणी झपाटलं जाऊ शकतं का? हा प्रश्न पडावा. तो जमाना फक्त मोठ्या रुपेरी पडद्याच्या आणि कृष्णधवल चित्रपटांचा होता. तर चित्रपट संगीत म्हणजे हिंदी गाणी, फक्त सार्वजनिक लाऊडस्पीकर किंवा हॉटेलातील रेडिओवर ऐकू यायची. घरोघरी टीव्ही किंवा रेकॉर्ड प्लेअर, ग्रामोफोन, टेपरेकॉर्डरही नसायचा. दर बुधवारी रात्री आठ वाजता रेडिओ सिलोनवरून 'बिनाका गीतमाला' या प्रोग्रॅममध्ये प्रसिद्ध निवेदक अमीन सायानीचा मधाळ आवाज आणि त्यांच्याच निवेदनात बुडालेली तितकीच मधाळ गाणी तेवढी शेजाऱ्यांच्या रेडिओवर किंवा चौकातील हॉटेलमधून कानावर पडायची आणि ऐकणाऱ्याच्या भावविश्वाचा ताबा घ्यायची.



*विलास शेळके*

अशाच कोणत्यातरी बुधवारी, 'नया दौर'

चित्रपटातील ‘माँगके साथ तुम्हारा’ हे रफी-आशा यांचं द्वंद्वगीत कधी कानावर पडलं आणि सगळ्या आयुष्यभरासाठी साथीला आलं ते कळलं नाही. ओपीबरोबरच मी आणि माझ्यासारख्या असंख्य रसिकांच्या सांगितिक आयुष्यात खरोखर एक नवं पर्व सुरू झालं. ते आजही संपलेलं नाही. त्या दोन दशकांतील म्हणजे १९५२ ते १९७२मधील गाणी आठवतात ती म्हणजे फक्त ओपींची गाणी. त्या गाण्यांचा संगीतकार आणि गायकही जणू ओपीच! गायक-गायिका कोणीही असोत जणू ती ओपीच्या कंठातून त्याच्याच सुरावटीतून आलेली. मग ते ‘बाबूजी धीरे चलना’ हे किंवा ‘आरपार’मधील अन्य गीता-रफींची द्वंद्वगीतं असोत, ती कालपर्यंत आशा-रफींनीच गायली आहेत माझा समज होता. याचाच व्यत्यास असा, की इथे गायकापेक्षा त्यांच्या कंठातून निघणारा आवाज ओपीचा होता. त्यामुळे गीता-आशा यांच्या आवाजातील द्वंद्व इथे नष्ट होतं आणि त्यांचे सूर असे एकरूप होतात, की हा आवाज कोणाचा हा प्रश्नही वर्षानुवर्षं पडू नये. या अनुभूतीनंतर सी. रामचंद्र यांनी केलेल्या विधानाची सत्यता पटते की, गायक-गायिका हे आपल्या जागी कितीही थोर असले, तरी ते सगळे टेपरेकॉर्डरच असतात, त्यांच्या गळ्यातून गाऊन घेणारा संगीतकार हाच श्रेष्ठ असतो. ओपीच्या संदर्भात तरी हे विधान सहज पटतं, कारण आशा-रफी यांच्याबरोबर झालेल्या वादामुळे किंवा अन्य कारणांमुळे त्यानं अन्य पर्यायी गायक-गायिकांकडून जशी आशा-महेंद्र कपूर (सावनकी घटा), गीता-रफी (आरपार), किशोर-शमशाद बेगम (नया अंदाज) गाणी गाऊन घेतली; पण तरीदेखील ती तितकीच गोड वाटली. श्रोत्यांना गायकांचा बदल न जाणवता! ओपीला रिदम किंग, ‘मेलडी किंग’ असं संबोधलं जातं. ओपीला काव्यरचनेतील सौंदर्याची उत्तम जाण होती, रचनेतील




गुणवंत माणसांच्या परीसस्पर्शानं आपल्या आयुष्याचं
खऱ्या अर्थानं सोनं होतं!
स्वत:च्या झळाळत्या तेजानं बरोबरच्या
आयुष्यांनाही लखलखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची
तेजाळ शब्दचित्रं.

चंदेरी - सोनेरी

विलास शेळके

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंस दिवाळी बोनस !

## १० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२४




कवीनं असावं अल्पाक्षरी,
आणि नाटककारानं मितभाषी.
अभिनेत्यानं करावा
संहितेतील अव्यक्त आशय व्यक्त.
प्रेक्षकांनी सगळं अनुभवावं,
एकाग्र होऊन.
समीक्षकांनी करावं
नाट्यानुभवाचं विश्लेषण अचूक.
पण मग, दिग्दर्शकानं काय करावं?

आरंभापासून अंतापर्यंत,
प्रत्येक क्षण उजळून टाकण्याचं
कसब शिकवावं.
हे का आणि कसं करावं?
सांगत आहेत,
मराठी नाट्यसृष्टीतील
अग्रणी दिग्दर्शक
आणि अभिनेते-
**चंद्रकांत कुलकर्णी.**

**मूळ किंमत : रु. ८००/- खास सवलतीत : रु. ६००/-**

**राजहंस दिवाळी बोनस !** (१० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२४)




सुधीर नांदगावकर यांचे हे पुस्तक, म्हणजे गुरुदत्तवरील त्यांच्या प्रेमाचा एक उत्कट आविष्कार ! गुरुदत्तच्या मृत्यूनंतर लगेचच त्याच्या घरी पोहोचलेल्या मोजक्या पत्रकारात नांदगावकरही होते. त्यावेळी झालेल्या चर्चा, पत्रकार म्हणून कळलेल्या काही आतल्या गोष्टी आणि गुरुदत्तविषयीचा अपार आदर यांमुळे 'त्याने आत्महत्या केली' यावर नांदगावकरांचा विश्वास कधीच बसला नव्हता... सुधीर नांदगावकर यांनी या पुस्तकाच्या लेखनासाठी विशेष प्रयत्नांनी माहिती गोळा केली आहे. 'चरित्र-कादंबरी-जीवनप्रवास' असा एक संमिश्र घाट स्वीकारला आहे. गुरुदत्तच्या आयुष्यातल्या एरवी फार लिहिल्या-बोलल्या न गेलेल्या घटनांचे तपशील, त्याच्या जगण्याचे, चित्रपटनिर्मितीचे, विचारप्रक्रियेचे काही नवे पैलू आपल्याला कळतात. आपल्या ओळखीचे चित्रपट, गाणी, यांचा जन्म कसा झाला, या माहितीत आपण गुंतत जातो आणि अनेकदा तर त्या घटनांचे जणू प्रत्यक्ष साक्षीदार आहोत, असे आपल्याला वाटत राहते.

**- श्रीकांत बोजेवार**

**मूळ किंमत : रु. ६००/- खास सवलतीत : रु. ४००/-**

## **राजहंस दिवाळी बोनस !** (१० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२४)




अन्न-वस्त्र-निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा.
कुतूहल ही नैसर्गिक प्रेरणा आणि बुद्धिमत्तेची नैसर्गिक देणगी
यांच्या बळावर माणसाने अनेक गोष्टींमागच्या शास्त्राचा शोध घेतला अन् कलात्मक सौंदर्याविष्कार घडवले.
कापसासारख्या वनस्पतिज अन् रेशमासारख्या प्राणिज पदार्थांच्या तंतूंच्या धाग्यांपासून मागावर वस्त्र विणणे; त्याला सोन्यासारख्या धातूच्या तारेची जरतारी जोड देणे या साऱ्यांतून साकारलेला वस्त्राविष्कार म्हणजे शास्त्र-कलेचा अनोखा संगम !
कित्येक शतकांची परंपरा, अनेक ज्ञात-अज्ञात विणकरांची प्रतिभा
आणि निरीक्षण-अभ्यास-प्रयोगातून जन्मलेली नानाविध तंत्रे
यांतून जगभरात विविध रूपांमध्ये वस्त्रनिर्मिती अन् वस्त्रसंस्कृतीचा विकास झाला.
दख्खनच्या पठाराच्या पश्चिम भागात अशीच एक देखणी वस्त्रसंस्कृती आकाराला आली.
जनजीवनाशी अतूटपणे एकरूप झालेल्या या वस्त्रधाग्यांच्या मोहक प्रतिमा
साहित्याच्या कथाकाव्यातून, चित्र-शिल्पांच्या रंगरेषांमधूनही उमटल्या.
एका हुन्नरी कलाकाराने, व्यासंगी अभ्यासकाने आणि जाणकार तज्ज्ञाने
विविधांगांनी घेतलेला या वस्त्रसंस्कृतीचा वेध.

**मूळ किंमत : रु. ९००/- खास सवलतीत : रु. ६००/-**

# ग्रंथ-धन योजना









राजहंसी पुस्तकांचं शतक आणि एक:
एकशेएक निवडक पुस्तकं...जुनी नव्हेत,
गेल्या चार वर्षांत प्रकाशित झालेली !













पुस्तकांची निवड
करायचीय?
क्यूआर कोड स्कॅन करा

**घसघशीत**
**३३ % सवलतीत**
**खास दसरा-दिवाळीच्या**
**सणात...**

**१० ऑक्टोबर ते**
**३० नोव्हेंबर २०२४**












शत ग्रंथ शोधताना...शतपूर्ती सार्थ झाल्या...
शत ग्रंथमालिकांच्या...दीपावली उजळल्या...










**ग्रंथ-धन आम्हा**
**सोनियासमान !**

# राजहंस दिवाळी बोनस !

(१० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२४)









ऐन दिवाळीत तुमच्या भेटीला...

प्रत्येक पुस्तकाची मूळ किंमत २०० रुपये

**खास सवलतीची किंमत १४० रुपये**

टपालखर्च रु. ५०/-

भूले बिसरे गीत?
छे छे, ही गाणी तर आठवणीतली,
तुमच्या-आमच्या काना-मनातली...
'राजहंस प्रकाशन' सादर करीत आहे,

## साठवणीतील गाणी

## लता - आशा - रफी - किशोर

हिंदी चित्रपटसंगीताच्या सुवर्णकाळातले
चार अमर मानकरी
चार पुस्तकं, तब्बल शंभर गाणी
आणि अनंत आठवणी...

### आवाजाचा अवलिया - किशोर कुमार
### चिरतरुण स्वर - आशा भोसले

लेखक : सुहास किर्लोस्कर

---

### सुरांची सम्राज्ञी - लता मंगेशकर
### नवरसांचा जादूगार - मोहम्मद रफी

लेखिका : डॉ. मृदुला दाढे

## **राजहंस दिवाळी बोनस !** (१० ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२४)




कोणतेही अस्तित्व निखळ चांगले किंवा निखळ वाईट नसते.
शतकाच्या उंबरठ्यावर असलेल्या हिंदुत्व परिवार आणि
मार्क्सवादी परिवारावरसुद्धा चांगल्या–वाइटाचे शिक्के बसले.
स्वातंत्र्यानंतर काँग्रेस परिवार वैचारिक कोलांट्याउड्या मारत राहिला.
काळाच्या ओघात काही पक्ष नाहीसे झाले, तर काहींचे अस्तित्व
मर्यादित राहिले. अनेक चांगल्या संघटना आणि संस्था डबघाईला
आल्या. पण हिंदुत्व परिवार आणि मार्क्सवादी परिवार यांनी
त्यांची तत्त्वे आणि त्यांची कॅडर यांच्या बळावर ठाम उभे राहून,
हातात सत्ता असताना व नसतानाही देशाच्या राजकारणात
आणि समाजकारणात महत्त्वाची भूमिका निभावली.
हे दोन परिवार आणि भारत यांच्या राजकीय वाटचालीचा हा मागोवा.

**मूळ किंमत : रु. १०००/- खास सवलतीत : रु. ७००/-**

प्रत्येक शब्दाचं वजन कवीला जसं कळतं, तसं त्याला पक्कं कळत होतं. त्यामुळेच त्या शब्दांमध्ये संगीतानं तो प्राण फुंकू शकला. ओपी स्वत: कवी असल्यामुळे हे शक्य झालं. 'प्रीतम आन मिलो', हे प्रथम सी. एच. आत्मा व 'मि. अँड मिसेस ५५' चित्रपटासाठी गीता दत्तनं गायलेलं गीत जरी त्यांची पत्नी सरोजमोहिनी नय्यरच्या नावावर असलं, तरी प्रत्यक्षात ते ओपीनंच लिहिलं होतं. कविता मुद्रित स्वरूपात वाचकांपुरती मर्यादित ठेवण्याऐवजी, त्याने संगीताच्या जादूतून श्राव्य स्वरुपात लाखो श्रोत्यांपर्यंत नेली आणि चित्रपटातील पडद्यावर दृग्गोचर होणाऱ्या गाण्यांनी ही कविता अगदी सर्वसामान्यांपर्यंत दृक् स्वरूपात पोहोचली.

मात्र दुर्दैवानं 'नया दौर'नंतर हिंदी फिल्मी गाण्यांचा विलक्षण जजबाती शायर साहिर लुधियानवीला त्यानं टाळलं. नया दौरच्या यशानंतर की ज्या चित्रपटाची सर्व गाणी साहिरची होती. केवळ साहिरनं 'प्यासा'च्या यशाचं श्रेय स्वत:कडे घेऊन एस. डी. बर्मनला संगीतकार म्हणून दुय्यम स्थान दिल्यामुळे! ओपी गीतरचनेला सर्वप्रथम महत्त्व देत होता. मात्र त्यानंच साहिरला गर्वाची बाधा होताच बाजूला ठेवलं. एस. डी. बर्मनप्रमाणे उद्या साहिर ओपीलाही दुय्यम स्थान देईल या भीतीनं. कदाचित ही भीती काल्पनिकदेखील ठरली असती! पण या गोष्टीची शहानिशा नंतर होऊच शकली नाही. यामागे दुसऱ्याच्या 'इगो'ला दुखावून स्वत:चा 'इगो' कुरवाळण्याची त्याची वृत्ती, हेही कारण असावं. तेच कारण त्यानं लता मंगेशकरला टाळण्यामागे असावं!

स्वत:च्या संगीताच्या गुर्मीत आणि चालींच्या धुंदीत वावरणारा ओपी मात्र आणखी कोणाला संगीतामधलं समजतं असं मानत असेल असं वाटत नव्हतं. पण परवा माझ्या वाचनात आलं, की तो त्याच्या चालीबाबत ज्या तीन व्यक्तींशी बोलत


मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं;
हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा
निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं?
काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे,
एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

विवाह नाकारताना

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)




असे त्या म्हणजे निर्माता/दिग्दर्शक एस. मुखर्जी, नट म्हणून गुरुदत्त, तर तिसरं नाव या दोघांपेक्षा अगदी वेगळं म्हणजे खलनायक-नायक बलदंड शरीरयष्टीचा शेख मुख्तार!

गुरुदत्त हा हिंदी चित्रपट सृष्टीतला अतिशय हळवा आणि संवेदनशील नट आणि प्रतिभाशाली निर्माता दिग्दर्शक होता; हे 'कागजके फूल', 'प्यासा'नंतर वेगळं सांगायची गरज नाही. या हळव्या गुरुदत्तमधल्या संवेदनशील कवीची नाळ थेट गाण्याच्या संगीतापर्यंत जाते. त्यामुळे त्याची आणि ओपीची नाळ जुळणं स्वाभाविक होतं.

म्हणूनच गुरुदत्तनं त्याच्या 'बहारे फिर भी आऐंगी' या चित्रपटाला संगीत देण्यासाठी ओपीला सांगितलं. चित्रपट गुरुदत्तवर चित्रित होत असताना, त्याची वैयक्तिक जीवनातील आंदोलनं मात्र तो लपवून ठेवत आला. या चित्रपटातील 'आपके हँसीन रुख पे आज नया नूर है' या अप्रतिम गीताची चाल ओपीनं बांधली. त्या रात्री ते दोघं गुरुदत्तच्या घरी रात्री उशिरापर्यंत बसले. ओपीनं तिथेच पियानोवर हे गाणं वारंवार वाजवून दाखवलं. गुरुदत्त त्या सुरावटीत हरवून गेला, मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुदत्त या जगातूनच निघून गेल्याची बातमी आली. या गाण्याची ही जन्मकथा ऐकेपर्यंत मला हे गाणं जसं पडद्यावर धर्मेंद्रच्या हसऱ्या चेहेऱ्यावर चित्रित झालं होतं तसं अतिशय प्रसन्न, उत्फुल्ल वाटायचं; मात्र त्यामागची ही दुःखद घटना कळल्यापासून हेच गाणं ऐकताना, गुणगुणताना विषण्ण वाटायला लागलं. त्या काळरात्री गुरुदत्त आणि ओपीमध्ये नेमके काय संवाद झाले असतील? पियानोवर गाणं वाजवताना ओपीनं डोळे मिटल्यामुळे तर त्याला गुरुदत्तच्या डोळ्यांत तरळणारे अश्रू, दुःखद भाव दिसले नसतील? की त्या अखेरच्या क्षणी हा संवेदनशील, तरल महान कलाकार खरोखरच तितक्याच महान कलाकाराच्या बोटांतून उमटणाऱ्या या सिंफनीच्या आनंदाच्या डोहात, आनंद-तरंगात डुंबत असेल? त्या दीड-दोन तासांच्या कालावधीत त्या मध्यरात्री ओपी धुंद होऊन पियानो वाजवतोय, त्याच वेळी गुरुदत्तच्या मनात नेमके कोणते विचार चालू असतील? गीताचे, वहिदाचे की फक्त 'बहारे फिर भी आऐंगी' या त्याच्या स्वप्नाचे! कोण लोक असतील त्या वेळी या दोन महान कलावंतांच्या आजूबाजूला साक्षीला? गीतादत्त त्या वेळी कुठे असेल? या प्रश्नांची उत्तरं द्यायला आज कोणीही नाही.

◆◆◆

## मी सखा मेघदूत

*खरं म्हणजे आम्हा मेघांना आमच्या विराट विश्वाचा अतीव अभिमान! पण मानवी मनाच्या विशालतेची, सखोलतेची अन् गहिरेपणाची व्याप्ती ही काकणभर अधिकच आहे.*

### मी कृतज्ञ...

माझी ही भावयात्रा युगानुयुगं स्मरणात राहील, अशीच आहे!

आषाढातल्या 'त्या' दिवशी रामगिरीपासून ते अलकानगरीपर्यंत प्रवासाला मी सुरुवात केली. यक्षाच्या विनंतीप्रमाणे त्याचा संदेश त्याच्या पत्नीपर्यंत पोहोचवून, मी अलकानगरीपासून पुन्हा रामगिरीपर्यंत आलो. हा प्रवास म्हणजे नुसतं अंतर पार करण्यासाठी केलेलं भ्रमण नव्हतं - तर ती होती एक मानसयात्रा! आषाढातल्या त्या दिवशी यक्षानं मला मनोविश्व बहाल केलं. त्या विश्वात विचारांचंच राज्य होतं. मानवी भावनांचा, नात्यांचा अन् त्यातल्या अनुबंधांचा अर्थ मला समजला, तोच मुळी यक्षामुळे!

ह्या साऱ्या प्रवासातली सर्वांत सुंदर गोष्ट काय असेल, तर ती म्हणजे प्रेमभावना निर्माण करणारं मन! सजीवांमधली विशेषत: मानवामधली एक अदृश्य शक्ती! ह्या शक्तीची रुजवण माझ्यामध्ये झाली अन् माझ्यामध्ये एक व्यक्ती म्हणून बदल होत गेला. त्या भावनांच्या आधारे मला माणूसपण समजत गेलं. आपल्या जिवलगाबद्दल वाटणारं प्रेम, प्रेमातून निर्माण झालेली विलक्षण ओढ, जिवलगाचा विरह, त्यातून निर्माण झालेली वियोगभावना, काळजी, व्याकूळता - ह्या एकात एक गुंफलेल्या भावनांचा खेळ पाहून मी प्रथम भांबावून गेलो. देहावर विविध रंगांची वस्त्रं लेऊन



*हर्षदा पंडित*

जलाशयांमध्ये डोकावत आपल्याच प्रतिबिंबावर खूश होणारा मी - मानवी भावनांच्या रंगछटा पाहून दिङ्‌मूढ झालो. आपल्याच मस्तीत कलंदरपणे जगणारा मी एक मेघ - त्या यक्ष अन् यक्षिणीचं परस्परांवरचं उत्कट प्रेम पाहून हरखून गेलो.

मानवी देहातलं मन ही निसर्गानं त्याला दिलेली केवढी मोठी देणगी! निसर्गाचाच अंश असलेल्या मानवावर निसर्गचक्राच्या बदलांचा आणि ऋतूंचा परिणाम झाला नाही, तरच नवल! म्हणूनच कार्तिक मासापासून ते ज्येष्ठ मासापर्यंत माझा यक्षसखा रामगिरीवर प्रियेच्या आठवणीत राहू शकला. पण आषाढ मासाचं वातावरण निर्माण झालं, वर्षा ऋतूची चाहूल लागली अन् त्याच्या मनात काहूर निर्माण झालं. कारण वर्षा ऋतूची प्रभाच निराळी! वर्षा ऋतू हा भूमीचा प्राण! ह्या ऋतूत सारा निसर्ग स्वत:चा जन्मोत्सव जणू रोमारोमांतून साजरा करतो. वर्षा ऋतूतले मेघ जेव्हा आकाशात दिसू लागले, तेव्हा यक्षाच्या मनातही अनेक भावनांची आंदोलनं निर्माण झाली. असं म्हणतात, की दाटून आलेले मेघ पाहून मानवाच्या मनात असंख्य भावना ओसंडून वाहू लागतात - आणि आम्ही मेघ जेव्हा शीतल सरींचा वर्षाव करतो, तेव्हा तर त्याचं मन भावधारांमध्ये चिंब भिजून जातं.

मानवाच्या ‘मन’ ह्या अवयवाचं मोठं कुतूहल होतं मला! जे मन त्याचं संपूर्ण भावविश्व नियंत्रित करतं, ते दिसत मात्र नाही. खरं म्हणजे, आम्हा मेघांना आमच्या विराट विश्वाचा अतीव अभिमान! पण मानवी मनाच्या विशालतेची, सखोलतेची अन् गहिरेपणाची व्याप्ती ही माझ्या आसमंताहून काकणभर अधिकच आहे, हे पाहून मानव जातीचा क्षणभर हेवा वाटला मला!

मला अजूनही प्रश्न पडतो, की माझ्यासारख्या अवखळ, चंचल पण अचेतन पदार्थामध्ये यक्षाला एक मन रुजवावंसं का वाटलं असेल बरं? माझ्यात सामर्थ्य होतं, ऊर्जा होती; पण जोपर्यंत माझ्यात मन नव्हतं, तोपर्यंत माझ्यात चेतना नव्हती.





बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह मात्र क्वचितच कोणी रंगवला... एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

बाय गं...

सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

त्या अदृश्य अशा मन नावाच्या शक्तीची माझ्यामध्ये रुजवण झाली, ती यक्षाच्या मनातल्या भावनांच्या अफाट सामर्थ्यामुळे! माझ्याप्रमाणेच मानुषीकरण झालेल्या यक्षाची आत्मशक्ती अतिशय प्रबळ होती. त्यातून निर्माण झालेल्या चैतन्यानंच माझ्यामध्ये सजीवपण ओतलं. अत्यंत उत्कटतेनं अन् आर्ततेनं यक्षानं मला साद घातली. माझ्यातल्या कणाकणाला हलवण्याची ताकद त्या विनंतीमध्ये होती. एका अचेतन वस्तूमध्ये चैतन्य निर्माण करणाऱ्या त्या भावनेमागे मनाचं केवढं सामर्थ्य असेल!

यक्षाला माझ्यामध्ये यांत्रिकपणे नुसती ऊर्जा निर्माण करायची नव्हती, तर माझ्यामध्ये संवेदना, भावना समजणारं 'मन' निर्माण करायचं होतं. कारण हा प्रवास भावनांचा होता. ह्या प्रवासातच मला भावनांच्या आधारे हळूहळू 'माणूसपण' समजत गेलं. पण मी नुसताच भावनांसह वाहत जात नव्हतो - तर सत्याशी हातमिळवणी करत भावना ग्रहण करत होतो. सत्य म्हणजेच ज्ञान नव्हे काय? ज्ञानाची ओळख होणं, म्हणजे माणूसपण शिकण्यातलाच एक पाठ आहे. मानव हा निसर्गाचाच एक भाग! म्हणजे पर्यायानं मानवी मन हादेखील सृष्टीच्या मूलद्रव्याचाच एक भाग आहे. मानवी मन आणि शरीर वेगळे नाहीत. मनात होणाऱ्या विचारांची निर्मिती हीच चैतन्याला अन् पर्यायानं कृतीला दिशा देते. कारण विचार हा मनाच्या कृतिशील अस्तित्वाचा ठसा आहे - अन् भावना म्हणजे विचारांना व्यक्त होण्यासाठी निर्माण झालेली संवेदना आहे. दोन्हीमध्येही उत्स्फूर्तता हवी! माझा मित्र यक्ष जाणून होता, की मनामुळेच मला उत्स्फूर्तपणे व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य मिळेल आणि माझ्या स्वैरपणाला काहीसा अटकावही बसेल. तो बुद्धिमान तर होताच पण एक अतिशय संवेदनशील मन आणि मृदुल भावना असलेले विचार त्याच्याकडे होते.

रामगिरीवर यक्षाच्या आसमंतात रोज माझ्याप्रमाणेच चंद्र, सूर्य, तारे-चांदण्या हे जसे त्याला दिसत होते, तसेच ते यक्षप्रियेलाही दिसतच होते. पण माझ्या मित्रानं


कशी होती सीता? विचारी आणि खंबीर?
की हतबल आणि भावुक?
महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या
विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...

सीता

अभिराम भडकमकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)




त्यांची कुणाचीही दूत म्हणून निवड केली नाही. तारे अन् नक्षत्र स्वत:चं स्थान कधीही बदलत नाहीत, तसंच चंद्र-चांदण्यादेखील कधी आपल्या कक्षा सोडत नाहीत. तो पवनसखा मुलखाचा अवखळ, बंडखोर अन् रूक्ष! दिशांचं ज्ञान असलं, तरी कसलं गांभीर्यच नाही त्याला! ही सारी परिस्थिती माझा यक्षसखा जाणून होता.

दूर एकांतवासात राहणाऱ्या यक्षाला कुठला मार्गही दिसला नसेल भावना प्रवाहित करण्याचा! वाफेसारख्या अदृश्य रूपात मी जल ओढून घेऊन ग्रहण करतो आणि दृश्य अशा पर्जन्यरूपात बरसून पाण्याला प्रवाहित करतो, हे यक्षानं पाहिलं होतं. त्याच्या मनातही भावनांच्या रूपात असंख्य आठवणी, घटना साठून राहिल्या होत्या. त्या व्यक्त करण्यासाठी, दृश्य रूपात प्रवाहित करण्यासाठी आणि नेमक्या ठिकाणी नेऊन बरसण्यासाठी त्याला मीच जवळचा वाटलो असेन.

हे स्नेहाचे कण जमा करत फिरणं हे माझ्या कामाचं स्वरूपदेखील किती सुंदर आहे! माझ्या यक्षसख्याच्या कमलपुष्पं तोडून आणण्याच्या कामासारखंच! अर्थात हेदेखील मला भावनांच्या सहवासात आल्यावरच समजलं. स्नेहाचं, प्रेमाचं कुठे ओझं होतं का? ज्याला मी ओझं म्हणत होतो, ते कुणासाठीतरी सुख होतं अन् ज्याला जबाबदारी म्हणत होतो, ते कुणासाठीतरी उपकार होते. ह्या जाणिवेनं जगण्याचा एक नवीन अर्थ समजला मला! कारण जो दुसऱ्यावर उपकार करतो, तो स्वत:वरदेखील उपकारच करत असतो. दुसऱ्यांकडून मिळणाऱ्या असंख्य दुव्यांनी त्याच्या आयुष्याची शिदोरी भरली जात असते. तो कधीच रिक्त-रिकामा असा नसतो.

माझ्या यक्षमित्राकडेदेखील सिद्धी होत्याच. त्यांच्यासह जगण्याची त्याला सवय होऊन गेली होती. केव्हाही, कुठेही अदृश्य होणं, प्रकट होणं, आपल्याला हवं ते निर्माण करणं, हवं ते रूप घेणं, पाहिजे तिथे पाहिजे तसा संचार करणं ह्या सिद्धी म्हणजे लाभ देणाऱ्या सवलतीच आहेत की! जगणं सुखकर करणाऱ्या अशा सिद्धींचं




कविकुलगुरू कालिदासाचे 'मेघदूत' हे खंडकाव्य म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार! कालिदासाच्या 'मेघदूता'चा जणू 'सीक्वेल' म्हणजे या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

## मी सखा मेघदूत

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

कधीच ओझं वाटत नसतं. यक्षाला तर त्या सिद्धींची सवयच झाली होती. अशा वेळी त्याचा यक्षमणीच कुबेर राजानं काढून घेतल्यावर तो अगदी रिक्त झाला - जणू शून्यवत! अशा असाहाय्य स्थितीत त्यानं आठ मास काढले आणि त्यानंतर त्यानं त्याच्या आयुष्याला अर्थ द्यायला, आकार द्यायला सुरुवात केली. अगदी शून्यापर्यंत येऊन ठेपलेल्या आयुष्याची एका सकारात्मक अशा संख्यारेषेवर वाटचाल करायला सुरुवात केली - तसंच काहीसं माझंही झालं! जोपर्यंत मला मनाचा स्पर्श झाला नव्हता, भावनांचा अर्थ समजत नव्हता; तोपर्यंत माझं जीवन शून्यवतच होतं. मनाचं बीज माझ्यात रुजवलं गेलं अन् भावनांच्या विश्वात वाटचाल करणाऱ्या भावरेषेनं माझंही आयुष्य बदलून टाकलं!

मी नतमस्तक होतो, ते माझ्या जन्मदात्या कालिदासापुढे! आषाढातल्या त्या प्रथम दिवशी ज्या क्षणी कालिदासांनी मला आपल्या भावछटांनी सचेतन रूप दिलं, त्याच क्षणी मी - यक्ष आणि यक्षपत्नीचीच नव्हे, तर असंख्य प्रेमी युगुलांची अन् विरहीजनांची मनं जिंकून घेतली. कालिदासाच्या दृष्टीनं रंग-रूप, वृत्ती-प्रवृत्ती, वय-अवस्था ह्या साऱ्यांना ओलांडून पलीकडे गेलेली प्रीतिभावना म्हणजे मेघदूत!

त्या प्रीतिभावनेला साहित्यात अजरामर केलेल्या माझ्या जन्मदात्यासमोर मी अखेरच्या श्वासापर्यंत कृतज्ञ आहे. त्याच्या ऋणातून मला कधीही मुक्त होता येणार नाही... म्हणून ही भावांजली! यक्षाच्या प्रीतिभावनेनं तर साऱ्या सृष्टीशी अनुबंध जोडलेच; पण मी स्वत: यक्षाशी जसा मैत्रभावानं बांधला गेलो, तसाच कालिदासाशी वात्सल्यभावनेनं बांधला गेलो आहे. कुठल्याही बंधनात कधीही न अडकणारा स्वच्छंदी मेघ मी - हे काव्यबंधन मात्र जन्मभर अभिमानानं मिरवेन, हा माझा शब्द!

◆◆◆


कला, साहित्य आणि समाज यांच्या मूल्यव्यवस्थांमध्ये
प्रचंड उलथापालथ करून टाकणाऱ्या
छोट्या पडद्यामागच्या भयाण वादळाला
चित्रित करणारी कादंबरी...



अॅट एनी कॉस्ट

अभिराम भडकमकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'राजहंसी' विविधा




भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरणातून
निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी
बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता
घायाळ झालेला समकाळ म्हणजे
'खांदे सुजलेले दिवस'हा कवितासंग्रह.

### खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची
पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत,
या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे,
मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी । सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)







ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची.
ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी
अपघातानं ती एक चूक करते.
पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं.
यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का?
परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# एक उलट... एक सुलट

*असूयेचा खेळ... तिच्या खेळात मला एक साचा दिसतो. त्यात ज्याच्यामुळे माझं 'राणीपद' धोक्यात येत तो बसणार -*

## अनसूया

पहिल्यांदा वयाच्या अडीचाव्या वर्षी ती मला वाटल्याचं आठवतं. असूया. त्या वेळी आम्ही नेवाशाला राहत असू. आमचं मोठं थोरलं घर होतं. त्या घरात फक्त माझं राज्य होतं. वामन आणि लक्ष्मणमामा ही दोन अतिशय प्रेमळ माणसं घरी कामाला होती. ती दोघं माझा प्रत्येक हट्ट पुरवत. त्यांची रात्रीची कामं संपली की, मी माझ्या शिशू शाळेत माझे 'टीचर' मला जे काही शिकवत ते त्यांची 'टीचर' बनून त्यांच्याकडून करून घ्यायचे. त्यात 'स्टँड अप, सीट डाऊन' नावाचा खेळ होता. साधारण चाळिशीचा वामन आणि पन्नाशीचे लक्ष्मणमामा हे धोतर, सदरा आणि डोक्यावर पांढरी टोपी घातलेले माझे आज्ञाधारक विद्यार्थी. मी हातात काल्पनिक छडी घेऊन त्या बिचाऱ्यांना बोबड्या आवाजात मोठमोठ्यांदा ओरडून 'स्टँड अप, सीट डाऊन' करत उठाबशा काढायला लावायची. तेही हसत हसत काढायचे!

संध्याकाळी आई आणि मी बऱ्याचदा फिरायला जायचो. बाबा खूप कामात असायचे, पण घरी असतील तर तेपण यायचे. एका हातात आईचा हात दुसऱ्या हातात बाबांचा, समोर सुंदर काळाशार रस्ता... जगातलं सगळ्यात सुखी बाळ असेन तेव्हा मी. चालता चालता दमले की 'कडेवर घे'चा हट्ट करायचा. आई एकटीच असेल तर कडेवर घ्यायची. बाबा थेट खांद्यावरच बसवायचे. त्या वेळी तर मी अखिल विश्वाची 'राणी' आहे असंच वाटायचं मला...



*अमृता सुभाष*

त्या दिवशी आई आणि मी दोघीच फिरायला गेलो होतो. थोड्या वेळानं मी ''कडेवर घे''चा हट्ट सुरू केला. पण आज आई दाद देईना. आई मला म्हणाली, ''अगं, माझ्या पोटात बाळ आहे ना, मग मी जड काही नाही उचलू शकत म्हणून नाही घेणार कडेवर.'' मला वाटलं, 'मीच हिचं बाळ आहे आणि हिच्या पोटात कसलं परत एक बाळ?'

दुसऱ्या दिवशी आम्ही पुन्हा फिरायला गेलो असताना मी आईला म्हटलं, ''आई, मला कडेवर घे, मी चालू नाही शकणार फार, कारण माझ्याही पोटात बाळ आहे!'' आई भरपूर हसली. 'का' ते मला कळलं नाही. त्या काळात बऱ्याच गोष्टी कळेनाशाच झाल्या...

मुळात, मी एवढी असताना माझ्या आई-बाबांना दुसरं बाळ हवंच का आहे, हेच कळेना. वाटलं, 'मी पालेभाज्या खात नाही, हट्ट करते, म्हणून हे दुसरं बाळ आणणार का काय?' गंमत म्हणजे, यानंतरचा, माझा भाऊ जन्माला येईपर्यंतचा आठ-नऊ महिन्यांचा काळ मला आता अजिबात आठवत नाही! त्याआधीचं आठवतं, त्यानंतरचं आठवतं, मधलं कुठे हरवलं कोण जाणे...

त्या काळात नंतर बहुधा मला माझ्या आजोळी रहिमतपूर गावी, माझ्या आजी-अण्णांबरोबर ठेवलं असावं. माझा भाऊ 'जय' जन्मल्यानंतर 'बाळ बघायला' म्हणून आई ज्या हॉस्पिटलमध्ये होती, तिथे आजी-अण्णा आणि मी गेल्याचं आठवतं आहे. पाळण्यात माझा भाऊ होता. मी त्याच्याकडे फारसं पाहिलं नाही. मी दारातून आत आल्या आल्या, खूप दिवसांनी दिसले म्हणून असणार, आई मला जवळ ओढून कवटाळून रडली होती असं आठवतं. मला फार बरं वाटलं होतं. त्यानंतर काही दिवसांनी त्या बाळाला घेऊन आम्ही पुन्हा आमच्या नेवाशाच्या घरी आलो. त्यापुढचे माझे दिवस पंचाइतीचे होते. मी तीन वर्षांची. त्या बाळाविषयी




कॅनव्हासवर शब्दांनी रंगवायला घेतलेली चित्रं
पुस्तकाच्या पानांवर रंगांनी लिहिली गेली तर?
- अशक्य असं जे घडतं,
ते म्हणजे हे पुस्तक! ही चित्रंच आहेत.
शब्दांनी रंगवलेली...

बिटविन द लाइन्स

चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

मला नक्की काय वाटतं आहे तेच कळत नव्हतं, प्रेम वाटत नव्हतं. पण इतर लोक त्या बाळाला बघून इतके खूश होत होते, विशेषत: आधी फक्त माझे असलेले माझे आई-बाबा, की मीही खूश व्हायला हवं असं वाटत होतं; पण आई सारखी त्या बाळाला दूध पाजते म्हणून रागही येत होता. माझा भाऊ खूप गोड गबदुल्या होता. तो तान्हा आणि मी साडेतीन वर्षांची असताना काढलेल्या एका फोटोत मी त्याचे गोबरे गाल हिंस्त्रपणे ओढताना दिसते आहे. माझं 'राणी'चं स्थान हिरावून घेणाऱ्या त्या गबदुल बाळावर जबरदस्ती प्रेम करायची ती माझी केविलवाणी धडपड असणार.

तो काळ माझ्या आयुष्यातल्या अनेक 'सुरुवातीं'चा होता. 'असूये'बरोबरच माझ्या आतल्या महत्त्वाकांक्षेचीही ती सुरुवात होती. महत्त्वाकांक्षा... आई-बाबांचं लक्ष भावाकडून माझ्याकडे वळवण्याची!

या सगळ्यात जगावेगळं काहीच नाही. माझ्या आई-बाबांना दुसरं बाळ हवं असणं स्वाभाविक, मला ते त्या वयात समजू न शकणं स्वाभाविक, बाळ छोटं असल्यानं आई-बाबा त्याच्याकडे जास्त लक्ष देणं स्वाभाविक आणि खरं तर त्यामुळे मला वाटणारी असूयाही स्वाभाविकच. त्या लहान वयात ती माझ्यातनं निरागसपणे व्यक्त होत राहिली. त्यामुळे तिची भीती नाही वाटली कधी. त्या वयात तिच्या माझ्यातल्या मोकळेपणानं ती परकी किंवा 'वाईट'पण नाही वाटली कधी.... पण मोठं होता होता तिचं-माझं नातं बदलत गेलं. तिचं असणं 'वाईट' असतं असं वाटायला लागलं. तिची लाज वाटायला लागली. त्या लाजेमुळे मी तिच्याशी अनेक खेळ खेळायला लागले. कधी ती माझ्यात नाहीच असं समजून मी आत असणाऱ्या तिच्याकडे दुर्लक्ष करून वरवर हसरा, सामंजस्याचा

साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

समांतर रंगभूमी :
पल्याड-अल्याड

माधव वझे




किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

मुखवटा लावला आहे, पण कधी मात्र तिला आतल्या आत दाबण्याचे प्रयत्न फोल ठरून ती बळजबरीनं बाहेर आली आहे. तिला दाबायचा प्रयत्न केला की ती फार त्वेषानं बाहेर येते, असा माझा अनुभव आहे आणि तेव्हा ती समोरच्यावर कितीही निर्घृण वार करू शकते. मग तिची अजूनच लाज वाटते. कधी ती माझा पूर्णच ताबा घेते आणि माझ्या आणि समोरच्यामध्ये एक थंड पडदा सोडते बर्फाचा. त्या पडद्यातून ना मला बाहेरचं दिसू शकतं ना त्या समोरच्या माणसाला आतलं. या सगळ्या खेळांमध्ये खूप दमछाक होते आहे. तिची आणि माझीही. तीच दमछाक मला आसपासच्या कितीतरी जणांची होताना दिसते आहे. माझ्या-तिच्या मारामारीसारखीच मारामारी मला जवळजवळ प्रत्येकाच्याच आत दिसते आहे. कुणी मान्य करेल, कुणी नाहीच म्हणत राहील. मला तिचं-माझं नातं नेमकं कशाकशातनं जातं आहे हे निकडीनं पाहावंसं वाटतं आहे. नकळत्या वयात जे झालं ते झालं, पण या कळत्या वयात तिचा दुस्वास सोडून तिला समोर बसवून तिच्या खेळाकडे नीट बघायची वेळ आली आहे. असूयेचा खेळ... तिच्या खेळात मला एक साचा दिसतो. त्यात ज्याच्यामुळे माझं 'राणीपद' धोक्यात येतं तो स्पर्धक बसणार. म्हणजेच माझा भाऊ. माझा पहिला स्पर्धक. समोर परीक्षकांच्या दोन खुर्च्या. ज्यात आई-बाबा बसलेत. इथपर्यंत ठीक, पण आता होतं काय, हळूहळू भाऊ आणि मी मोठे होतो. तो त्याच्या क्षेत्रात जातो. मी माझ्या. मग तो माझा स्पर्धक उरतच नाही. मग तो त्या असूयेच्या खेळातल्या साच्यातून उठून निघून जातो आणि त्या साच्यात माझ्या क्षेत्रातलं दुसरं कुणीसं येऊन बसतं - ज्या व्यक्तीमुळे माझं त्या क्षेत्रातलं 'राणीपद' धोक्यात आलं आहे असं मला वाटत असतं. आता मी मोठी झालेली असते, घरातून बाहेर पडलेली असते, आई-बाबांपासून स्वतंत्र झालेली असते. त्यामुळे परीक्षकांच्या खुर्चीतले आई-बाबाही उठून गेलेले असतात. तिथे येतात त्या वेळचे असे कुणीतरी, ज्यांच्यासमोर मला स्वत:ला सिद्ध करायचं असतं. म्हणजे




तिच्या मनातली विचारवादळं आणि अनुभव,
यातूनच या पुस्तकातले लेख
विणले गेले आहेत...
एक उलट... एक सुलट!

एक उलट... एक सुलट

अमृता सुभाष

आवृत्ती चौथी । किंमत : ₹ २२५/- । (ट.ख. ₹ ५०)

लहानग्या वयातला लहानगा खेळ आपण मोठे झालो हे विसरून आपण पुन्हा पुन्हा खेळत राहतो. वरवर पाहता वाटत राहतं, त्या समोरच्या माणसामुळे मला त्रास होतो आहे, त्याच्यामुळे मला असूया वाटते आहे, पण सजगतेनं, मोठ्या माणसांच्या डोळ्यांनी पाहिलं की जाणवतं, या त्रासाचा संबंध माझ्या आतल्या लहानपणीच्या 'राणीपदाच्या' अट्टहासाशी आहे. 'राणीपद' कुणाला आवडत नाही? पण आयुष्यात कुणालाही ते सतत मिळणं कसं शक्य आहे. जेव्हा जेव्हा ते मिळत नाही, तेव्हा आतमधल्या रुसलेल्या राणीला प्रेमानं समजावलं तर....

मला या घडीला माझ्या 'सलमा' नावाच्या भूमिकेची आठवण होते आहे. 'साठेचं काय करायचं?' हे राजीव नाईक लिखित नाटक. यात दोनच व्यक्तिरेखा. सलमा आणि अभय. अभय ॲड जगतातला. अतिशय महत्त्वाकांक्षी. 'साठे' नावाच्या दुसऱ्या एका ॲड आणि फिल्ममेकरशी सतत स्पर्धा करणारा. त्याला वाटणाऱ्या साठेविषयीच्या असूयेनं त्याचं संपूर्ण आयुष्यच व्यापून गेलेलं... इतकं की सलमा आणि अभयच्या शृंगारातसुद्धा जणू तो साठे त्या दोघांमध्ये काल्पनिक उभा ठाकलेला. सलमा हे सगळं समजू पाहणारी. कधी शांतपणे, कधी हतबल होऊन. मात्र, त्या असूयेमागे फरफटत एका क्षणी अभय जेव्हा 'लाच देण्याचं' काळं पाऊल टाकू पाहतो, तेव्हा मात्र सलमा ठामपणे त्याला थांबवायला उभी ठाकते. 'सलमा' हीसुद्धा एक माणूसच. तिलासुद्धा असूया वाटते. ती कॉलेजमध्ये शिकवत असते. तिच्याऐवजी दुसऱ्याच एका प्रोफेसरला बढती मिळते. तेव्हा तिला दुःख होतं. असूया वाटते. पण ती ते लपवत नाही. त्यापासून पळत नाही. ती ते व्यक्त करते पूर्णपणे. एका प्रसंगात ती अभयच्या पूर्वी घडलेल्या प्रेमप्रकरणाविषयी बोलते, तेव्हाही त्या 'दुसऱ्या' मुलीविषयी तिला वाटलेली असूया लपवत नाही. ती अभयला उद्देशून म्हणते, ''दीज लिप्स् हॅव बीन टच्ड्, दीज हॅंड्स हॅव बीन टच्ड्....... हे (तुझ्याबद्दलचं) फिलिंगच गेलं नव्हतं माझं, कितीतरी दिवस....''

काव्य हा उर्दूचा प्राणदिवा. अनेक श्रेष्ठ कवी तिच्या
निळ्या ज्योतीवर पुन्हापुन्हा झेप घेत होते नि लिहित होते.
त्यांची कहाणी म्हणजे हे पुस्तक.
शायर आणि शायरीची मनभावन मैफल.

चौकात उधळले मोती

अंबरीश मिश्र



आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

पण तिची असूया कधीच तिचा तोल ढळू देत नाही. तिला त्या असूयेची लाज वाटत नाही, त्याविषयी मोकळेपणा वाटतो. म्हणूनच कदाचित सलमा त्यातून चटकन स्वत:ला बाहेर काढू शकते. सलमा मला खूप काही शिकवू पाहते आहे... मला ते शिकायचं आहे.

मुळात, अनसूया म्हणजे असूयाच नसणं हे संस्कारांचं शिकवणं आता मला पटत नाही आहे. असूया नसणंच हे अस्वाभाविक, खोटं आहे. मला वाटतं 'सलमा' ही खऱ्या अर्थानं अनसूया आहे. कारण ती 'असूये'शी 'तू मुळात मला वाटतेसंच का आणि कशी?' असं अवास्तव भांडण मांडत नाही. ती तिला 'आपले'पणानं स्वीकारते आणि म्हणूनच तिच्या पार जाऊ शकते. मात्र, मला 'अभय'ही समजू शकतो कारण तो माझ्या आतही आहे. पण मला अभयचं आयुष्य जगायचं नाही. कारण त्यात आयुष्य हे त्याचं उरलंच नाही. ते 'साठेचं' होऊन गेलं आहे. मला माझं एकुलतं एक आयुष्य 'माझं' म्हणून जगायचं आहे. मी इतक्या सहजासहजी ते दुसऱ्या कुणाचं होऊ देणार नाही.

◆◆◆


साडेतीन हजार वर्षांपेक्षा
अधिक इतिहास असलेला ग्रीस देश.
सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल ही
वैभवशाली परंपरा एकीकडे.
दुसरीकडे आर्थिक दुरवस्था,
बेरोजगारी, व्यसनाधीनता!
प्राचीन काळापासून अद्ययावत वर्तमानातील
ग्रीसच्या विस्तृत पटाचा वेध -



**ग्रीस**

मिनिष उमराणी

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# गेले लिहायचे राहून

*ते सेवेच्या परंपरेतून आलेले स्वातंत्र्यसैनिक, तर मी सत्तेच्या प्रेरणा असलेला स्वातंत्र्योत्तर काळातील कार्यकर्ता.*

## मास्तर

ग. प्र. प्रधान व मी एकमेकांना नावाने ओळखत होतो. चार-दोन वेळा भेटीगाठीही झाल्या होत्या. परंतु घसट व मैत्री नव्हती. १९७८ साली महाराष्ट्रात पुलोद सरकारची स्थापना झाली. मी मंत्रीमंडळात होतो व ग. प्र. प्रधानांचा पक्ष सत्तेत सहभागी झाला होता. गाठीभेटी वाढत होत्या. एकदा एक बैठक आटोपल्यावर मी त्यांना हाक मारली.

''अहो प्रधानसर–''

ते जवळ आले व म्हणाले, ''अहो, एक विनंती आहे. तुम्ही मला मास्तर म्हणा, सर म्हणू नका. मला मास्तर म्हणून घेणं जास्त आवडतं.''

मी म्हणालो, ''माझीही एक विनंती आहे.''

''काय?''

''तुम्ही मला 'आहो जाहो' करू नका. 'अरे तुरे' करा आणि विनायकराव न म्हणता 'विनायक' म्हणा. तुम्ही असं म्हटलेलं मला आवडेल.''

आमचा करार १९७८ साली झाला व तो आम्ही दोघेही पाळतो.

पुढे मी विधानपरिषदेचा सदस्य झालो. मास्तरही परिषदेत होते. आमची गट्टी इतकी जमली, की थोडा वेळ मिळाला की आम्ही दोघेच गप्पा मारत असू. हळूहळू आवाजात जिवाभावाचे मैतर मारतात तशा. इतरांना फक्त आमच्या खिदळण्याचा आवाज जायचा. आम्ही



*विनायक पाटील*

काय बोलतो, ते ऐकू जात नसे. सगळ्याच सदस्यांना आमच्या मैत्रीचे कुतूहल होते. ते सेवेच्या परंपरातून आलेले स्वातंत्र्यसैनिक, तर मी सत्तेच्या प्रेरणा असलेला स्वातंत्र्योत्तर काळातील कार्यकर्ता. ते उच्च विद्याविभूषित, तर मी कोणी विचारलेच तर ऐकू जाणार नाही अशा बेताने बीएपर्यंत असे सांगणारा. बीएपर्यंत शिक्षण सांगावे व तिकीट मागण्याच्या बायोडाट्यात तसे लिहावे, ही शरद पवारांनी मला शिकविलेली ट्रिक. म्हणजे आपण एसएससी पास असतो व पदवी मिळालेली नसते. या काळात आपण एक दिवस जरी कॉलेजला गेलेला असलो, तरी बीएपर्यंत म्हणावे. म्हणजे आपली सोय होते. तर काय शिक्षणातील ही तफावत निवडणुकांचे तिकीट मिळवायला ठीक आहे. पण प्रधानांशी मैत्री जमवायला हे पुरेसे नव्हते. त्यांच्या माझ्या वयातही पिढीचे अंतर आहे. विधानपरिषदेला दुपारी अर्ध्या तासाची सुट्टी असते. त्या वेळेतही आम्ही लॉबीत बोलत असू. किंवा कँटीनमध्ये एकत्र जात असू. मास्तर टोस्ट व चहा घेत. मी चहाच्या सुट्टीतदेखील दणकून खात असे. अगदी जेवणच. आमच्यात काहीही समान नव्हते, तरी दोस्ती घट्ट होती व कोणत्याही विषयावर आम्ही बोलत असू किंवा कोणताही विषय आम्हाला चालत असे. मनोहर जोशी त्या वेळी विधानपरिषदेचे सदस्य होते. ते एकदा म्हणाले, ''आता मास्तरचे काही खरे नाही. त्यांना विनूची शिकवणी लागली आहे.'' हजर असलेले सर्व खो खो हसले. मी व प्रधान त्यात सामील झालो. विनूची शिकवणी चालूच होती. मास्तरला आपण बिघडवू शकू, अशी मला खात्री होती. झाले मात्र उलटे. मीच बिघडलो. मास्तर सहीसलामत. हल्ली तर चहाच्या काय जेवणाच्या वेळीसुद्धा मी फक्त टोस्ट खातो. आलिया भोगासी, दुसरे काय?





साम्यवादाचं नाव लावणाऱ्या चीनमध्ये
प्रत्यक्षात आहे 'नियंत्रित भांडवलशाही'च.
भारताबरोबरचा संघर्ष वा अमेरिकेशी स्पर्धा -
चिनी सत्ताधीश धोरणं ठरवताना
इतिहासातल्या सूत्रांचा आधार घेतात.
हे चिनी प्रारूप समजावून देणारं पुस्तक -

मेड इन चायना

गिरीश कुबेर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

पुढे परिषदेचा सहा वर्षांचा कार्यकाळ संपला. निवृत्त होणाऱ्या सदस्यांना सभागृहाकडून निरोप दिला जातो. त्यांच्याविषयी व त्यांच्या सभागृहातील कामकाजाविषयी इतर सदस्य व सभापती भाषणे करतात.

मास्तरांचा निरोपाचा दिवस होता. ना. धों. महानोर व मी सभागृहात शेजारी बसलो होतो. मी ना.धों.ला म्हणालो, ''भाऊ, मास्तरला आपण वेगळा निरोप देऊ, जो त्यांच्या कायम लक्षात राहील.''

''म्हणजे कसा?'' महानोर.

मी म्हणालो, ''मी एक मोगऱ्याचा गजरा घेऊन आलो आहे. निरोप समारंभ संपल्यावर तो मास्तरांच्या हाताता बांधायचा – तवाईफच्या कोठीवर गाण्याच्या बैठकीला नवाब लोक बांधतात तसा अन् त्यांना सांगायचं - तसाच रुबाबात बसून मनगट नाकापर्यंत नेऊन मास्तरांनी तो हुंगायचा! क्या सीन है।''

महानोर खळखळून हसले.

सभागृहाचे कामकाज संपल्यावर मी व महानोर मास्तरांजवळ गेलो. मी माझ्या जवळचा मोगऱ्याचा गजरा पुढे केला व माझा प्लॅन मास्तरांना सांगितला. मास्तर लाजले.

हास हास हसले.

हसताना लाललाल झाले.

हसताना त्यांच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले.

त्यांनी चश्मा काढून ते पुसले. म्हणाले, ''काहीतरीच काय वेडेपणा! गजरा मी तसा ठेवून घेतो. फुलं चांगलीच असतात, मला आवडतात. पण हातात बांधणं नको,

भारताच्या सहा शेजारी देशांतील
ठरावीक व्यक्तींना भारताचे नागरिकत्व
ज्या कायद्याने मिळू शकते,
त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा
वेध घेणारे -

नागरिकत्व दुरुस्ती कायदा
घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे



किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

बाबा.'' मास्तरांच्या अंगात साने गुरुजी संचारले होते. फुलं चांगली असतात. मलाही आवडतात वगैरे वगैरे.

मी म्हणालो, ''मास्तर, फुलं आम्हालाही आवडतात. महानोरांच्या कवितेत फुलं असतात. मी फुलशेती करतो. प्रश्न तो नाही. प्रश्न आहे - तुम्ही गजरा हातात बांधण्याचा. एवढ्या वर्षांच्या शिकवणीत मी तुम्हाला बिघडवू शकलो नाही – म्हणजे काय? माझ्याही रेप्युटेशनचा प्रश्न आहे. साला दुसऱ्यांना बिघडवणारांनाही इज्जत असते.'' प्रश्न इज्जतीवर येऊन थांबला.

मास्तरांना माझी दया आली असावी. मी अडचणीत होतो व अडचणीतल्या लोकांना मदत करणे हे मास्तरांच्या पिढीचे व्रतच होते. ते म्हणाले, ''रस्त्यात नको. आपण माझ्या खोलीवर जाऊ. तेथे गेल्यावर हा कार्यक्रम करू.''

मी म्हणालो, ''हार साले गळ्यात चालतात, मनगटावर का नकोत?''

''अरे, अर्थ बदलतो.'' मास्तर

''जागा बदलून म्हणजे खोलीत चालतो.'' मी.

मास्तर पुढे, मी व महानोर मागे – अशी आमची मॅजेस्टीक हॉटेलपर्यंत वरात निघाली. मास्तरांची खोली तेथे होती. खोलीत गेल्यावर मास्तर कॉटवर बसले. मी त्यांच्या मनगटावर मोगऱ्याचा गजरा बांधला.

मास्तरांनी तो पोज घेऊन मैफिलीत हुंगतात तसा हुंगला व निरागस, निष्पाप, सात्त्विक मास्तर मला देवासारखे भासू लागले. मी त्यांना वाकून नमस्कार केला. त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. मला रडू कोसळले. मनात आले, आता कसल्या भेटीगाठी – ते पुण्यात, आपण नाशिकला.

◆◆◆




हे लेखन म्हणजे,
मध्यलयीत चाललेला नर्म विनोदाचा ताल!
किस्से, प्रसंग, घटना वाचत असताना
केवढा मोठा काळ, किती लहानमोठ्या व्यक्ती
वाचकांच्या डोळ्यांपुढून सरकून जातात!

गेले लिहायचे राहून

विनायक पाटील

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

# देठ जगण्याचा

*योग्य कारणांसाठी सारासार विवेक वापरून दिलेला नकार किंवा विधायक टीका म्हणजे निगेटिव्ह थिंकिंग नव्हे.*

## मनाची प्रतिकारशक्ती

आजकाल मुलांना लहानपणापासून 'मागू ते मिळेल', अशी सवय लागते. त्यांना कशालाही 'नाही' म्हणायची सोयच उरलेली नाही. खाऊ हवा, खेळणी हवीत, नवे कपडे हवेत अशा एके काळच्या प्राथमिक गरजांचा परीघ आता खूपच विस्तारत आहे. आता स्कूटर हवी, कॉंप्यूटर हवा, मोबाईल हवा अशा नव्या नव्या महागड्या गोष्टींचा त्यात समावेश होत आहे. यातल्या एकाही मागणीनंतर जर पालकांनी 'नाही' म्हटले, तर ते उत्तर ऐकून मान्य करणे आमच्या भावी पिढीला कठीण जात आहे. लहान मुलांनी एका निबंधस्पर्धेत तर आम्हांला 'जाहिरातीतली आई हवी' अशी मागणी केल्याचे वाचायला मिळाले आहे!

काही वेळा लहान गोष्टींना 'नाही' म्हटलेले सहन न होण्यातून सुरू होणारा मुलांचा मानसिक प्रवास, पुढे अधिक अवघड वळणावर जाऊन पोचतो. परीक्षेतले गुणांचे आकडे जेव्हा 'मुलाला अभ्यास येत नाही', हे जाहीरपणे सांगू लागतात; तेव्हा कोवळ्या वयातली काही मुले आत्महत्येकडे वळतात. एखादी मुलगी जेव्हा तिच्यावर एकतर्फी प्रेम करणाऱ्याला 'नाही' म्हणते, तेव्हा ते सहन न होऊन प्रेयसीला प्रियकराने पेटवून दिल्याच्या बातम्या वाचनात येतात. खरे तर 'प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहू दे' असे म्हणण्याची आपल्याकडची एके काळची परंपरा! माधव जूलियनांच्या कवितेतील प्रियकराच्या मनाचा हा उदारपणा बाळगणे आमच्या आजच्या तरुण वर्गाला का जड जात आहे?



*नीलिमा गुंडी*

एखाद्या नकाराने आपले समग्र जगणे थोडेच थांबते? फार तर एक वाट सीमित होईल! पण इतर वाटा धुंडाळण्याची हिंमत का हरली जावी?

भयाने नि अहंकाराने येणारा मनाचा ताठरपणा घालवून त्यांच्या मनाची लवचीकता कायम राखण्याकडे आपण सतत लक्ष द्यायला हवे. नाहीतर त्यांना वाटणारी भीती हळूहळू वाढतच जाते. अनवट वाटा चोखाळण्याची भीती, अपेक्षाभंगाची भीती, असुरक्षितपणापासून आलेली भीती, अपमानाची भीती, समवयस्कांच्या चेष्टेची भीती, पाठ केलेले परीक्षेत विसरू याची भीती! या भीतीच्या बागुलबोवासाठी लहानपणापासूनच कडू औषध हवे.

लहानपणी मुलांना बाळकडू द्यायची पद्धत आपल्याकडे असे. त्यातली कडू मात्रा अंतिमत: पोषकच असते. 'नकार' हीसुद्धा अशीच पथ्यकारक कडू मात्रा आहे. वास्तवाचे सम्यक आकलन करून त्याचा स्वीकार करण्यासाठी प्रसंगी नकार पचवायची तयारीही हवी आणि अगदी दाही दिशांतून नकार आले, तरी 'अकरावी दिशा' तर आपल्या सर्जनशीलतेतून शोधता येतेच, असा आत्मविश्वासही जागा व्हायला हवा.

आजकाल भौतिक समृद्धी, मर्यादित कुटुंबपद्धती, परस्पर संवादांतील वाढते अंतर यांमुळे पालक मुलांना नकाराची मात्रा देण्यात कचरत आहेत; पण त्यामुळे मुलांना दिवास्वप्नात राहायला नकळत प्रोत्साहन मिळत आहे. मला येथे आमच्या लहानपणीच्या पाठ्यपुस्तकातली एक कविता आठवते. 'धावत धावत आला बालक' अशी कवितेची सुरुवात होती. द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा आणि त्याची आई यांच्यातला भावपूर्ण संवाद त्यात टिपला होता. राजवाड्यात राहणाऱ्या आपल्या मित्रांकडून आलेला अश्वत्थामा तेथील 'अपूर्व सुंदर' पेयाविषयी आईला सांगतो. गरिबीमुळे असहाय झालेली त्याची आई त्याला पेय देते आणि शेवटी 'दूध नव्हे रे पिठात पाणी कालवुनी तुज राजा दिधले,' अशी कटू वास्तवाची कबुलीही देते. त्या कवितेतला भावसंघर्ष म्हणजे आईचा स्वत:तील जागरूक पालकत्वाशी चाललेला झगडाच वाटतो!

हा बालअश्वत्थामा खरे तर आजही वेगळ्या रूपात आहेच की! आज अनेक लहान मुले परिस्थितीशी संघर्ष करत शिकत आहेत. मुलांच्या अभिव्यक्तीला महत्त्व देणाऱ्या फलटणच्या 'कमला निंबकर बालभवन'मधल्या आठवीतल्या एका गावाकडच्या मुलाच्या कवितेत त्याचा प्रत्यय येतो. दिवसभर मोट चालवायचे काम त्याला करावे लागत आहे. अशा वेळी तो लिहितो :

*'बा म्हणतु, सकाळच्या पारी धर जा दारी*
*तिन्हीसांज झाल्याबिगिर येऊ नगं घरी*

*मग तुम्हीच सांगा मास्तर*
*ईऊ कसा साळंत?'*

प्रकाश अनभुले या मुलाची ही व्यथा अशा अनेक कोंडलेल्या मनांची प्रातिनिधिक व्यथा ठरते. काही मुलांचे बालपण असे अभावग्रस्त परिस्थितीचे टक्केटोणपे खात घडत आहे आणि दुसरीकडे नकाराचा वाराही सहन होत नाही, अशी काहींची परिस्थिती आहे!

हल्ली आपल्याकडे 'पॉझिटिव्ह' विचारांचा खूप बोलबाला होत आहे. मात्र काही वेळा तो योग्य पद्धतीने होत आहे का, याचा पुनर्विचार व्हायला हवा. योग्य कारणांसाठी, सारासारविवेक वापरून दिलेला नकार किंवा विधायक टीका म्हणजे 'निगेटिव्ह थिंकिंग' नव्हे, हे लक्षात घ्यायला हवे. ऊठसूट नकारघंटा वाजवणे वेगळे आणि योग्य वेळी भान जागे करण्यासाठी नकाराधिकार वापरणे वेगळे! अनुकूल घडायची इच्छा जरूर धरावी, पण प्रसंगी प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यायला तयारही राहावे! गोष्टींमधल्या राजकुमारालासुद्धा 'सात समुद्र' ओलांडावेच लागतात ना! शेवटी, 'प्रत्येक फुलाच्या पोकळीत अंधारच असतो.' हेही सत्यच असते.

एक साधाच प्रसंग माझ्या लक्षात राहिला आहे. मी शिक्षणक्षेत्रात नव्याने पाऊल ठेवले होते. संक्रांतीचा दिवस होता. विद्यार्थिनींनी मला तिळगूळ दिला आणि 'गोड बोला' असे सांगितले. मी म्हटले, ''तिळगूळ घेते, पण प्रसंगी कटू बोलायचा हक्क राखून ठेवते!'' त्या विद्यार्थिनींनी सहज हसून मान्यता दिली होती. का कोण जाणे, पण आजकाल अशा विद्यार्थ्यांची प्रजाती कमी होत चालल्याचे दिसत आहे! ही परिस्थिती नक्कीच बदलायला हवी. त्यासाठी मुलांना लहानपणापासूनच 'बाळकडू' द्यायला हवे, असे अगदी मनापासून वाटत राहते.

◆◆◆


अनुभव, वाचन, निरीक्षण यांचा मेळ साधत
फुललेले भावपूर्ण, चिंतनपर लेखन.

देठ जगण्याचा

डॉ. नीलिमा गुंडी

किंमत : ₹ १२५/- । (ट.ख. ₹ ५०)



## बालवाचकांना दिवाळीला भेट देण्यासाठी 'राजहंसी' पुस्तके




मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी,
म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये
अनेक अभिनव उपक्रम राबविणाऱ्या
एका शिक्षकाने लिहिलेल्या या कथा!

स्थानिक बोली अन् ग्रामीण मातीचा
गंध असलेल्या,
ग्रामीण आयुष्याचे अनेक पदर
वाचकांसमोर आणणाऱ्या...

### आबली

प्रमोद प्रकाश धायगुडे

किंमत : ₹ १००/- । (ट.ख. ₹ ५०)




मुलं आणि पालक या दोघांनाही
डोळ्यांसमोर ठेवून केलेलं
खुसखुशीत लेखन.
रंगमंच, अभिनय, कॅमेरा, लघुपट, प्रहसन
अशा अनेक गोष्टींची माहिती आणि
अनुभव देणारं लेखन.
मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या
सहा नाटिकांचं संकलन -

### टगी गँग आणि इतर प्रयोगक्षम नाटिका

अजित ठोसर

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

## सृजनाचा मळा

*खेळांसाठी खेळ हीच मेघांची प्रतिज्ञा असते, म्हणून ते निश्चिंतपणे आणि निरामयतेने भ्रमण करीत असतात. परमेश्वराची लीला अशीच असते.*

## मेघदूत

हायस्कूलात असताना, एका धड्यात 'मेघदूता'चा संदर्भ आला होता. तो शिकवताना गुरुजींनी कालिदासाची ती सगळी कथा आम्हांला समजावून दिली होती. व्याकूळ प्रियकर-प्रेयसीचे संदेश एकमेकांना पोहोचवण्याची गोड कामगिरी मेघांनी स्वखुशीने स्वीकारली होती. कबुतरे आणि पारवे पत्रांची ने-आण करीत असत; परंतु ती जबाबदारी मेघांकडे सोपवून कवीने किती कल्पनाविलास साधला होता, याचे स्पष्टीकरण गुरुजींनी केले.

प्रीतीच्या राज्यात गाठभेट, वियोग, पुनर्भेट, प्रतिज्ञा यांना वेगळेच स्थान असते. आजच्या ई-मेलच्या जमान्यात पत्राला क्षणात उत्तर मिळते. हुरहुर नाही, वाट पाहणे नाही, धडपडणे नाही, तडफडणे नाही, मनधरणी नाही. पूर्वी किती मोलाची कामगिरी ढग बजावीत असत. संगणकामुळे ढगांवरदेखील बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे!

निळ्याशार आकाशातून कधी एखादा पांढुरका ढग एखाद्या संन्याशाप्रमाणे संथ गतीने एकटाच प्रवास करतो.

ढग एकटा असतो. त्याचे एकाकीपण सर्वांना दिसत असते. माणूस गर्दीत असतो. गोतावळ्यात असतो आणि खूपदा तो ढगांपेक्षाही कितीतरी एकटा, एकाकी असतो. तशात तो आतून रिकामा आणि कोरडाठाक असला, तर त्याच्या वेदनेला अंत नसतो.

वास्तविक एकाकीपणा हे कधीकधी वरदान ठरू शकते. चिंतनशीलतेचे बोट पकडून माणूस



*फादर फ्रान्सिस दिब्रिटो*

जीवनाच्या गाभ्यापर्यंत पोहचू शकतो. तिथे गेल्यावर त्याला आत्मदर्शन घडत असते. संत अगस्तीन नावाचा थोर साधुपुरुष आफ्रिका खंडात चौथ्या शतकात होऊन गेला. पूर्वायुष्यात तो वासनेच्या भोवऱ्यात भोवंडत होता. वासना भोगून ती त्याला संपवायची होती; परंतु त्या प्रवासात, आपणच संपत आहोत याची जाणीव त्याला झाली आणि तो कामातून नामाकडे वळला. तो शाश्वताचा शोध करू लागला. त्याने एकांतवासाची वाट पकडली. तासन्‌तास तो वृक्षवेलींच्या सहवासात घालवू लागला. आपल्या मनाच्या खोल कुहरात डोकावून पाहण्याचे धैर्य त्याने दाखवले. त्याला आत्मदर्शन झाले, दिव्यदर्शन झाले, सौंदर्यदर्शन झाले. एकांतवासात माणसाला स्वत:ची खरी ओळख होत असते. गीतेत म्हटल्याप्रमाणे आपणच आपले मित्र असतो, नि आपणच आपले शत्रू (६:५-६). ज्या व्यक्तीला 'आतला मित्र' गवसतो, त्याला एकटेपणा पर्वणीसारखा वाटू लागतो.

वैशाखात मेघांची दाटी वाढू लागते. त्यांच्या झुंडीच्या झुंडी पश्चिम सागरावरून पूर्वेच्या दिशेने डुलत, डोलत निघतात. त्यांची कांतीही हळूहळू बदलत जाते. पांढऱ्यात सावळेपण बेमालूम मिसळून जाते. मृग लागतो तशी ढगांची दाटी होऊ लागते. गर्भवतीप्रमाणे त्यांची चाल संथ होते. त्यांचे आकार अवाढव्य होतात. रूपही जांभूळकाळे बनते. अस्तंगत झालेल्या महाकाय प्राण्यांची रूपे ते धारण करतात. शोभादर्शक (कॅलिडोस्कोप) किंचित कलते करावे आणि प्रत्येक हालचालींबरोबर नवनवीन आकृत्या दिसाव्यात, त्याप्रमाणे क्षणाक्षणाला ढगांची रूपे बदलत जातात, कधी हत्ती, उंट आणि जिराफ यांच्या जोड्या, तर कधी रथ, घोडे आणि घोडेस्वार यांच्या फौजा. विनाव्यत्यय चालू असलेली ती चित्रमालिकाच.

त्या वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात पाचगणीला होतो. पहिला पाऊस झाल्यामुळे हवेत गोड गारवा आला होता. मेघांच्या झुंडी येत होत्या, जात होत्या.




अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत पिचत असलेल्या
समाजाच्या प्रगतीसाठी उमटलेला
संवेदनशील सूर.

अजान आणि चालिसा

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

ऊन-सावल्यांचा खेळ सुरू होता. गारव्यामुळे भर दुपारचे सोनिया ऊन रजईप्रमाणे अंगावर घ्यावेसे वाटत होते. दुपारच्या जेवणानंतर बागेत खुर्च्या टाकून ढगांची मौज पाहत आम्ही बसलो होतो. काळसर पांढुरके ढग येत होते आणि लगबगीने निघून जात होते. ते सूर्याजवळ पोहोचले की, त्यांचे रूप पालटायला लागे. बाहेरच्या कडा बौद्ध भिख्खूच्या वस्त्राप्रमाणे पिवळ्याधमक होत. क्षणात त्यात केशरी रंग मिसळे. सूर्याभोवती त्यांचे कडे झाले की, एक वर्तुळाकार इंद्रधनुष्य पाहायला मिळे. एकदा बेल्जियममधून दिवसा रोमला परतत होतो. आकाशात ढगांची दाटी झाली होती. तेव्हा रथाच्या चक्राइतकी भलीमोठी वर्तुळाकार इंद्रधनुष्ये आकाशात पाहायला मिळाली.

ऑलिंपिकसारख्या खेळांचे दर्शन रुपेरी पडद्यावर घ्यावे लागते. मेघांच्या शर्यती मात्र सर्वांसाठी खुल्या असतात. किती नाना तऱ्हेच्या त्या क्रीडा असतात. मेघ ही ईश्वराची प्रतीके वाटतात. विश्वाचा कारभार चालवणारा विश्वंभर तरी काय करत असतो? त्याची लीला अगाध असते. अर्धनारीनटेश्वराचे सनातन नृत्य अखंडपणे सुरू असते. मेघांचेही सतत विलोभनीय विभ्रम सुरूच असतात.

'खेळासाठी खेळ' हीच मेघांची प्रतिज्ञा असते, म्हणून ते निश्चिंतपणे आणि निरामयतेने भ्रमण करीत असतात. परमेश्वराची लीला अशीच असते. क्रीडेच्या आनंदासाठी तो क्रीडा करत असतो. नफ्या-तोट्याची गणिते तिथे नसतात. नफातोटा, लाभ-हानी यांच्या पलीकडे एक जग असते, याची जाणीव व्यवहारी माणसाला असणे आवश्यक आहे. मुक्त आर्थिक नीती आपण स्वीकारली आहे. आता रुपये, आणे, पै आणि युरो, पौंड, डॉलर यांचे एकसुरी, कर्कश संगीत सारखे कानांवर आदळत आहे. नफा हाच जीवनाचा मंत्र झाला आहे. विधिनिषेध नसतील, तर नफा म्हणजे ओरबाडणे ठरत असते. म्हणूनच संतांनी आपल्याला सांगून ठेवले, 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी।।'


गात गात देत राहणे, देता देता भरून पावणे
हा आनंदाचा मूलमंत्र. निसर्गाच्या खुल्या पाठशाळेत
तो आपलासा करता येतो. हळव्या कविहृदयाच्या
धर्मोपदेशकाची ही अभिव्यक्ती.



सृजनाचा मळा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

अर्थार्जन हा आपण एक पुरुषार्थ मानला आहे. त्याचबरोबर देत राहणे हा महापुरुषार्थ आहे. कर्णाकडून ती दीक्षा आपण घ्यायला हवी. गणती न करता कसे देत राहायचे, ते आषाढातील मेघांकडून शिकावे. काळ्याकुट्ट मेघांनी अख्खे आकाश भरून येते. ते तुकतुकीत मेघ किती मनोहर वाटतात. कृष्णवर्णाचे असूनही त्यांचे सौंदर्य किती खुलून दिसते! मन मायेने आणि करुणेने ओथंबून भरलेले असले की, कुब्जासुद्धा सुंदर दिसू लागते.

कधीकधी पिसाळलेल्या वाघासिंहांसारखे मेघ डरकाळ्या फोडू लागतात. आकाशमंडळ डळमळायला लागते. भर दुपारी अंधारल्यासारखे होते आणि मग ढगांचा संयम सुटतो. कितीतरी तास वृष्टी होत राहते. आकाशाचे छप्पर तर फाटतेच. परंतु गरिबाच्या घराचे छप्परही कोसळून पडण्याची भीती वाटू लागते. मेघ अगदी लक्षावधी करांनी देत असताना, घेताना, वेचताना भूमीची त्रेधातिरपीट उडते. तिचा स्वभाव आईचा, त्यामुळे जमेल तितकी माया ती आपल्या पोटात साठवून ठेवते. परमेश्वराचा कृपाप्रसाद तिच्या देहाच्या कणाकणाला भिडत असतो. ओल्या मायेने ती गदगदून जाते. पडत्या पावसात झाडेझुडपे हिरवीगार दिसू लागतात. वर्षावाने ती धुंदफुंद होतात, बेभान होतात. त्यांच्या अंगावरून आनंद निथळत असतो. वृक्षांचे आणि ढगांचे एक अतूट नाते असते.

समान धर्मीयांशी मैत्री अधिक बहरत असते, असे म्हणतात. ढग आणि वृक्ष यांचे स्वभाव किती भिन्न आहेत. ढग चंचल आहेत. ते कधीच एका जागी स्थिर नसतात. गती ही त्यांची स्थिती आहे. गतीमध्ये त्यांची प्रगती असते. मेघ उंचावरून विहार करीत असतात. कधी वाटते, या मेघांच्या गावाला जावे आणि त्यांना डोळे भरून पाहावे. त्यांच्याशी हितगूज करावे. त्यांच्या खांद्यावर बसून पृथ्वीचा प्रवास करावा. मेघांचे 'अनित्यपण' हे जीवनातील एक सर्वांत मोठे असे सत्य आहे. एकटा अनंत सोडून बाकी सारे अनित्य आहेत, याची जाणीव होणे हे दिव्यज्ञान आहे. जीवनातील अनित्याची आठवण करून देणारे मेघ आपले गुरू आहेत.

आणि वृक्ष? वृक्ष जन्मतःच अचल असतात.. आपल्या मुळांशी एकनिष्ठ राहून ते रुजल्या जागी ठामपणे उभे असतात. त्यांचे अस्तित्व ध्यानस्थ ऋषींसारखे भासते. शिष्यांची जमवाजमव करण्यासाठी या ऋषींना रानोमाळ हिंडावे लागत नाही, उलट शिष्यच त्यांच्या पायाशी येत असतात. ज्यांच्या अंगी पुण्याईचे बळ असते, त्यांच्याभोवती साधकांचा मेळा भरत असतो. वृक्ष अचल नि मेघ सदा चंचल, तरीही दोघांची मैत्री गहिरी. देत राहणे, फळाची अपेक्षा न करता देत राहणे, हेच दोघांना जोडणारे साधर्म्य. त्यामुळे त्यांची गट्टी जमली आहे. जे आपल्याला मिळाले आहे ती आपली कमाई नाही, ती पुण्याई आहे. ती मुक्तपणे, निरपेक्षपणे वाटून द्यायची असते ही दोघांची धारणा!

मेघांची आणि वृक्षांची मैत्री मनाला मोहिनी घालते. सहवासाने मैत्री फुलते, हे खरे आहे; परंतु कधीकधी अंतर असूनही मैत्री फुलत असते. कुठे चंद्र नि कुठे कमलिनी, तरी त्यांच्यात बहरते ना मैत्री! किरणांच्या केवळ दर्शनाने कमलपुष्पाच्या काळजात उमटतात ना अमृताचे तरंग. मेघ आणि वृक्ष यांची मैत्री अशीच अस्पर्श, म्हणून पावन, पवित्र!

प्रीतीच्या प्रांतात कधीकधी सहवास अडचण ठरू शकतो. जवळपणाचे बंधन होऊ शकते. खलिल जिब्रान पति-पत्नीला सांगतात, ''जवळजवळ उभे राहा; परंतु अति जवळ नको. कारण मंदिराचे स्तंभ एकमेकांपासून वेगळे असतात. ओक आणि सायप्रस (सुरू) वृक्ष परस्परांच्या सावलीत नाही मोठे होत. उभयतावर प्रेम करा; परंतु प्रेमाचे होऊ देऊ नका बंधन. तुमच्या आत्म्यांच्या किनाऱ्यांमध्ये असू द्या एक खळबळता सागर.''

मेघ देतो, वृक्ष घेतो. वृक्ष देतो, मेघ घेतो. विश्वाच्या प्रारंभापासून त्यांची प्रीतीची देवाणघेवाण अप्रतिहतपणे सुरू आहे. दोघांचे स्नेहबंध युगायुगांचे. एक चिरंतन मैत्री! मेघ आणि वृक्ष यांच्यात असते एक अनामिक ओढ. युगे आणि युगे सरली, तरी टिकून आहे त्यांचा अकृत्रिम स्नेह. मायलेकरांसारखा अतूट जिव्हाळा. जोपर्यंत हा नातेसंबंध अबाधित आहे, तोपर्यंत वसुंधरेचे अस्तित्व सुरक्षित राहील.

एकदा पावसाळ्यात डोंगर-माथ्यावर असताना अचानक आकाश भरून आले. मेघांची दाटी झाली. मेघदूतांचे थवेच्या थवे कळसावर अवतरले. झाडावेलींना त्यांनी कवेत घेतले. समोरचे काहीही दिसेनासे झाले. अंधारून आले. अवघे धूसर झाले. जीव घाबराघुबरा झाला.

मनात विचार चमकून गेला. असाच एक दिवस उगवेल... सभोवती अज्ञात दूतांची दाटी होईल... देहाचा निरोप घेऊन, ढग होऊन आत्मा अज्ञाताच्या प्रवासाला निघेल... एकटा!

◆◆◆

कधी न गळणारा

## 'राजहंसी' मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा

**'राजहंस ॲप'**

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
ॲंड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही 'राजहंस'ला असेही भेटू शकता

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अतुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# व्हेरिकोज व्हेन्स







## आजाराची वृद्धी व तीव्रता कमी करण्यासाठी उपयुक्त आयुर्वेदिक तेल

लक्षणे - पाय दुखणे, पायाला सूज येणे, पाय जड वाटणे, पायांच्या शिरा फुगून वेड्यावाकड्या होणे आणि प्रगत अवस्थेत तळपायाजवळ फुटून रक्तस्त्राव होणे. व्याधी दुर्धर अवस्थेत जाण्यापूर्वीच वापरण्यास सुरुवात करा.




सूचना : व्हेरिकोज व्हेन्स ही एक दुर्धर व्याधी आहे. हे तेल विकाराची तीव्रता कमी करणे व प्रगती रोखणे आणि वेदनांपासून आराम देण्यासाठी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृती, विकाराची तीव्रता आणि शारिरिक प्रतिसाद यानुसार परिणामांमध्ये फरक पडू शकतो.

| 100 ml पॅक | 200 ml पॅक |
|---|---|
| MRP Rs. 450/- | MRP Rs. 750/- |

(सर्व करांसहित)

**सर्वत्र प्रमुख मेडीकल स्टोर मध्ये उपलब्ध**

**वेरिहील कॅप्सूल्स**
सुद्धा उपलब्ध

**Esvee Pharmachem Pvt. Ltd.**
412, Narayanpeth, Pune - 411030.
Ph :020 24450072 / 73.

**Helplines** (10 am to 6 pm only) **: 7888011004 ; 9423044267**

Registered Rajhans Granthavedh (REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

तुमच्या निरोगी आयुष्याचे सच्चे साथीदार!




शतहार्ट
अर्जुन, गुग्गुळ, अश्वगंधा
यांच्या अर्कातून बनविलेले

शतलिवर
गुळवेल, भूमी आवळा, तुळस
यांच्या अर्कातून बनविलेले

शतकिडनी
पुनर्नवा, गोखरू, ब्राह्मी
यांच्या अर्कातून बनविलेले

शतायु आयुर्वेदच्या शतहार्ट, शतलिवर आणि शतकिडनी सोबत चिंतामुक्त आनंदी आयुष्य जगुया!

अभय देव यांचे
शतायु आयुर्वेद

ASUN MEDIA

आमच्या शाखा

सारंग सोसायटी, सहकारनगर • 98230 10734 | ट्रेजर पार्क, संतनगर, पुणे • 91684 34777
चितळे जवळ, डेक्कन • 97655 77977 | डेक्कन बस स्टॉप, पुलाचीवाडी • 81492 91003
आझाद नगर, कोथरूड, पुणे • 93075 26653 | आंबेडकर चौक, वारजे • 97304 65536

प्रमुख वितरक:
इसवी फार्माकेम प्रा. लि.
४१२, नारायण पेठ, मुंजाबा बोळ,
पुणे ४११ ०३०
020 24450072 / 73

भारतातील सर्व कंपन्यांची आयुर्वेदिक औषधे, काढे, चूर्ण, तेल व कॉस्मेटिक उपलब्ध. भारतात व परदेशात घरपोच सेवा +91 87960 21003

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे